cmyk

## संपादकीय

### स्लिपर सेलची जागा इन्फ्लुएन्सरने घेतली !

गेल्या काही वर्षांमध्ये इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढल्यानंतर सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्ममध्येही वाढ झाली. या प्लॅटफॉर्मचा वापर करून आपला कंटेंट समाजातील विविध थरांपर्यंत पोचवून आणि प्रतिसाद मिळवून चांगले उत्पन्न मिळवणारे काही सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरही तयार झाले आणि लोकप्रियही झाले. अशा प्रकारे आपल्या एखाद्या कृतीला प्रतिसाद मिळवून त्या माध्यमातून पैसे मिळवणे ही जरी सर्वसामान्य गोष्ट असली,


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### माओवाद शेवटच्या घटका मोजतोय : मुख्यमंत्री फडणवीस

नागपूरः छत्तीसगडमध्ये २७ माओवादी मारले गेले. महाराष्ट्रात अनेकांनी आत्मसमर्पण केले. आता माओवाद निश्चितपणे शेवटच्या घटका मोजत आहे, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी माध्यमांशी बोलताना केला. छत्तीसगडमध्ये माओवाद्यांचा मास्टरमाईड, देशातला जहाल नेता बसव राजू याचा सुरक्षा दलांनी खात्मा केला आहे. हा अशा प्रकारचा व्यक्ती होता ज्यानी चंद्राबाबू नायडू यांच्यावरील हल्ला तसेच छत्तीसगडमध्ये काँग्रेसचे नेते, अनेक मंत्री यांना मारले होते. ७५ सीआरपीएफ, केंद्रीय पोलीस जवान यांच्या हत्येत हात होता, तो बसव राजू आणि इतर २६ माओवादी बस्तरमधील चकमकीत मारले गेले आहेत.

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–२९ शुक्रवार, दि.२३ मे २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

# बोगस बियाण्याचे धागेदोरे मंत्रालयापर्यंत !

नागपूर । प्रतिनिधी

**महाराष्ट्र बोगस बियाण्यांचा अड्डा झाला असून, बोगस बियाण्यांचे धागेदोरे मंत्रालयापर्यंत पोहचलेली आहेत, असा गंभीर आरोप विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केला. तसेच राज्य सरकारच्या धोरणांवर सडकून टीका वडेट्टीवार यांनी केली आहे. ते गुरुवारी (दि.२२) पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी वडेट्टीवार यांनी बोगस बियाण्याकडे लक्ष वेधले.**



## वडेट्टीवार यांच्या गंभीर आरोपाने खळबळ

वडेट्टीवार म्हणाले, ''आळीमिळी चुपीचिळी, तुम्ही आम्ही मिळून खाऊ, असा प्रकार राज्यात झाला आहे. बोगस बियाण्याचे धागेदोरे मंत्रालयापर्यंत आहेत. सगळे मिळून हा प्रकार राजरोसपणे करतात. यावर मुख्यमंत्री लक्ष घालतील, नाहीतरी शेतकरी आत्महत्यामध्ये महाराष्ट्र पुढे गेलेला आहे. पुन्हा त्याचा उच्चांक गाठू नये, असेही वडेट्टीवार यांनी मत व्यक्त केले. राज्यात शेतकरी आत्महत्या गंभीर प्रश्न झाला आहे. नैसर्गिक आपत्ती, नापिकी, सरकारची उदासीन धोरण आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्या वाढू लागल्या आहेत. यावर वडेट्टीवार यांनी मुख्यमंत्र्यांना यामध्ये लक्ष घालण्याची मागणी केली. वडेट्टीवार म्हणाले, बोगस बियाणे येत असतील तर गंभीर बाब आहे. त्यामुळे कायद्यात दुरुस्ती करून बोगस बियाणे विक्री आणि निर्मिती करणाऱ्यावर दहा वर्षांची शिक्षा करणारे बील आणावे. तसेच शेतकऱ्यांना लुटणाऱ्या आणि फसवणाऱ्यांना माफ करता कामा नये, अशी भूमिका सरकारने स्वीकारावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली. पुढे बोलताना वडेट्टीवार यांनी शेतकरी कर्जमाफीच्या आश्वासनाकडे लक्ष वेधले. शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली नाही. त्यावर थातूरमातूर औषधोपचार करण्याची चर्चा मंत्रिमंडळ बैठकीत झाली. परंतु ठोस निर्णय झाला नाही, अशी खंत व्यक्त केली. तसेच अवकाळी ◀◀ पान २ वर

# बीड पोलीस दलात मोठा फेरबदल ६०६ कर्मचाऱ्यांच्या बदल्या !

## पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत यांचा मोठा निर्णय



बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची बिघडती परिस्थिती आणि पोलीस यंत्रणेवरील वाढत्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी मोठा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील तब्बल ६०६ पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.**




**या निर्णयाने बीडच्या पोलीस वर्तुळात खळबळ उडाली आहे.**

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणानंतर बीड पोलीस यंत्रणेवरून नागरिकांचा विश्वास उडाला होता. जिल्ह्यात दिवसाढवळ्या होणारे अपहरण, दरोडे, मारहाणीच्या घटनांनी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर ◀◀ पान २ वर

### “ इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या बदल्या लवकरच

एकाच वेळी ६०६ कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्यानंतर आता पोलीस खात्यातील चालक, पोलीस अंमलदार आणि पोलीस अधिकारी यांच्या बदल्याची उत्सुकता लागली असून, पुढील आठवड्यात या बदल्या केल्या जाणार असल्याचे समजते. या संवर्गात मोडणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांनी आपली बदली कोठे होणार, याबाबत धसका घेतला असून, पोलीस अधीक्षक यांच्याकडे याबाबत सर्व प्लॅनिंग तयार असल्याचे समजते. आता कोणाच्या कोठे बदल्या होणार याबाबत पोलीस खात्यामध्ये प्रचंड उत्सूकता लागली आहे.

### “ पहिल्यांदाच एकाचवेळी एवढ्या संख्येने बदल्या

बीड पोलीस खात्यामध्ये आतापर्यंत अनेक वेळा बदल्या झाल्या आहेत. मात्र एकाच वेळी ६०६ कर्मचाऱ्यांच्या बदल्या यापूर्वी कधीच झालेल्या नाहीत. पहिल्यांदाच एकाच वेळी एकाच लॉटमध्ये एवढ्या मोठ्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या झालेल्या आहेत. एवढ्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या एकसाथ करणे अवघड असतानाही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी ते करून दाखविले आहे. या बदल्यावरून काही कर्मचारी नाराज झाल्याचे सांगण्यात येत आहे.

# पंतप्रधानांचे पुन्हा एकदा चित्रपटांसारखे पोकळ डायलॉग

## बिकानेरमधील पंतप्रधान मोदींच्या सभेवर काँग्रेसचा हल्लाबोल

नवी दिल्ली । वृतसंस्था

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरूवारी बिकानेर येथील जाहीर सभेत 'ऑपरेशन सिंदूर'बाबत मोठे वक्तव्य करताना म्हटले की, ज्यांनी सिंदूर पुसण्याचा प्रयत्न केला, त्यांना आम्ही मातीत मिसळले. या वक्तव्यावर काँग्रेस पक्षाने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी पंतप्रधानांनी पुन्हा एकदा चित्रपटासारखे पोकळ डायलॉग बोलल्याचा आरोप केला आहे.**



काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी सोशल मीडिया 'एक्स'वर पोस्ट करत म्हटले, बिकानेरमध्ये पंतप्रधानांनी पुन्हा एकदा चित्रपटासारख्या पोकळ डायलॉगचा आधार घेतला. त्यापेक्षा देशाने विचारलेल्या गंभीर प्रश्नांना उत्तरे देणे अधिक महत्त्वाचे आहे. पहलगाममधील क्रूर हत्याऱ्यांना अद्याप मोकाट का सोडले आहे? काही अहवालांनुसार, गेल्या १८ महिन्यांत पूंछ, गगनगीर आणि गुलमर्ग येथील तीन दहशतवादी हल्ल्यांमागेही हाच दहशतवादी गट होता असे समोर आले आहे. जयराम रमेश यांनी पंतप्रधानांना अनेक प्रश्न विचारले. ते म्हणाले, ''आपण आतापर्यंत सर्वपक्षीय बैठकीचे अध्यक्षपद का स्वीकारले नाही? विरोधी पक्षांना विश्वासात का घेतले गेले नाही? ऑपरेशन सिंदूरदरम्यान उघड झालेल्या चीन-पाकिस्तानच्या संगनमताला पाहता, सध्याच्या परिस्थितीनुसार ठराव पुन्हा तयार करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन का बोलावले नाही? गेल्या दोन आठवड्यांत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प ◀◀ पान २ वर

# महाराष्ट्रात मान्सूनपूर्व पावसाचा धडाका !

## पुढील ३६ तास महत्वाचे ; या जिल्ह्यांना रेड-ऑरेंज अलर्ट

पुणे । प्रतिनिधी

**गेल्या चार दिवसांपासून महाराष्ट्रातील विविध भागांत मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. कोकण किनारपट्टीसह मुंबई आणि उपनगरांत पुढील ३६ तासांत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याचा इशारा मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राच्या प्रमुख शुभांगी भुते यांनी दिला आहे. अरबी समुद्रात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र आणखी तीव्र होऊन उत्तरेकडे सरकत असल्याने पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर पुढील २-४ दिवस मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा देण्यात आला आहे.**

मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राच्या प्रमुख शुभांगी भुते यांनी सांगितले की, अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून, ते पुढील ३६ तासांत तीव्र होऊन उत्तरेकडे सरकणार आहे. यामुळे कोकण किनारपट्टीवर जोरदार पाऊस पडेल. रायगड आणि रत्नागिरीसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे, तर मुंबई, ठाणे, पालघर, पुणे, नगर, संभाजीनगर, नाशिक आणि सिंधुदुर्ग यांना ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. वाऱ्याचा वेग ३५-४० किमी प्रतितास आणि काही ठिकाणी ६० किमी प्रतितासपर्यंत ◀◀ पान २ वर

### 'शक्ती' चक्रीवादळाचा संभाव्य धोका

अरबी समुद्रात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे 'शक्ती' चक्रीवादळाचा संभाव्य धोका वाढल्याचे संकेत हवामान विभागाने दिले आहेत. रत्नागिरी आणि सातारा येथे अतिवृष्टीसाठी रेड अलर्ट, तर मुंबई आणि पालघरमध्ये मुसळधार आणि ठाण्यात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. साताऱ्याच्या घाट परिसरात पूरजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे.

# बीड शहरातील नागरी समस्या तातडीने सोडवा !

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली रा.काँ.च्या शिष्टमंडळाचे सीओना निवेदन

बीड । प्रतिनिधी

**शहरातील नागरी समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) शिष्टमंडळाने नगरपरिषद मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याकडे गुरुवारी (दि.२२) केली. पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात माजी नगरसेवकांचा समावेश होता. विविध विभागांतील समस्यांवर ठोस कृती आराखडा राबवावा, असेही निवेदनात म्हटले आहे.**



निवेदनात पुढे म्हटले आहे की, शहरातील मान्सूनपूर्व स्वच्छता, नालेसफाई, पथदिवे, रस्त्यांची दुरवस्था, पाणी पुरवठ्याची विस्कळीत व्यवस्था, अपूर्ण गाळे व बाजारपेठांची कामे, तसेच आरोग्य सुविधा आणि कर वसुलीतील अडचणी आदी मुद्द्यांवर शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांना धारेवर धरले. सध्या शहरातील अनेक मुख्य नाले कचऱ्यामुळे तुंबले असून, त्यामुळे डास, दुर्गंधी व आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. हे नाले तातडीने यंत्राच्या सहाय्याने साफ करण्यात यावेत. तसेच, नव्या घंटागाड्या, ◀◀ पान २ वर

# तास्मॅकवरील छाप्यावरून सर्वोच्च न्यायालयाने ईडीला फटकारले

नवी दिल्ली। वृतसंस्था

सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी (२२ मे) सर्व मर्यादा ओलांडल्याबद्दल अंमलबजावणी संचालनालयाला फटकारले आणि तामिळनाडू राज्य विपणन महामंडळ कार्यालयांवर छापे टाकल्यानंतर ईडीच्या तपासाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली.

### सर्व मर्यादा ओलांडल्याचे ईडीला सुनावले

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश बी आर गवई म्हणाले की, एखादे महामंडळ गुन्हा कसा करू शकते? ईडी सर्व मर्यादा ओलांडत आहे, अशा शब्दात ईडीतर्फे उपस्थित असलेल्या अतिरिक्त सॉलिसिटर ◀◀ पान २ वर

# गेवराई येथील अवैद्य गर्भलिंग निदान प्रकरणाचे दोषारोपपत्र खंडपीठाकडून रद्द

## पीसीपीएनडीटी कलमानुसार पोलीस न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करू शकत नाहीत

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

गेवराई येथे अवैधरित्या गर्भलिंग निदान केल्याप्रकरणी जिल्हा शल्यचिकित्सक बीड आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष बीड यांच्या संयुक्त कार्यवाहीनुसार अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय गेवराई यांच्या फिर्यादीनुसार गेवराई पोलिसांनी आरोपी विरुद्ध गर्भपात अधिनियम आणि पी सी पी एन डी टी कलमानुसार दाखल केलेले दोषारोपपत्र उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रद्द केले आहे.

४ जानेवारी २०२४ रोजी गेवराई उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ मे २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- |
| गहू: ७९.०० क्विंटल | | |
| २,३५१ | २,९२१ | २,६६३ |
| ज्वारी/हायब्रिड: २३८.५० क्विंटल | | |
| १,८०० | ३,५३१ | २,३९३ |
| मका/लोकल:५४.०० क्विंटल | | |
| २,००० | २,१८० | २,११६ |
| तूर : १०.०० क्विंटल | | |
| ४,६०० | ६,७०० | ६,३२२ |
| उडीद : १.०० क्विंटल | | |
| ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: २७२.०० क्विंटल | | |
| २,१०० | २,७०० | २,४४५ |
| मुग :४.५० क्विंटल | | |
| ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: १७.५० क्विंटल | | |
| ४,००० | ४,३०० | ४,१६६ |
| हरभरा: ४३.५० क्विंटल | | |
| ५,३०० | ६,५०० | ५,५७१ |

# भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशनच्या मदतीमुळे कामाला बळकटी मिळाली–आ.संदीप क्षीरसागर





## बिंदुसरा नदी स्वच्छता आणि खोलीकरणाच्या कामातील योगदानाबद्दल आ.क्षीरसागरांकडून आभार व्यक्त

बीड । प्रतिनिधी

सध्या आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून व नगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील बिंदुसरा नदीपात्रात स्वच्छता व खोलीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेत योगदान म्हणून भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन यांनी स्वेच्छेने आपले योगदान देत या महत्त्वाच्या कामात हातभार लावला आहे. त्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी त्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

मागील ३ दिवसांपासून बीड शहारातील बिंदुसरा नदीपात्रात ◀◀ पान २ वर

cmyk

cmyk



## अग्रलेख

# स्लिपर सेलची जागा इन्फ्लुएन्सरने घेतली !

गेल्या काही वर्षांमध्ये इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढल्यानंतर सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्ममध्येही वाढ झाली. या प्लॅटफॉर्मचा वापर करून आपला कंटेंट समाजातील विविध थरांपर्यंत पोचवून आणि प्रतिसाद मिळवून चांगले उत्पन्न मिळवणारे काही सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरही तयार झाले आणि लोकप्रियही झाले. अशा प्रकारे आपल्या एखाद्या कृतीला प्रतिसाद मिळवून त्या माध्यमातून पैसे मिळवणे ही जरी सर्वसामान्य गोष्ट असली, तरी या सोशल मीडियाचा वापर करून जेव्हा शत्रुराष्ट्रासाठी हेरगिरी केली जाते तेव्हा सोशल मीडियाची ही दुसरी बाजू भीषणपणे समोर येते. गेल्या काही दिवसांमध्ये भारतात विविध ठिकाणी पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याप्रकरणी ११ जणांना अटक केली आहे. ते सर्वजण सोशल मीडियाशी संबंधित असून इन्फ्लुएन्सर्स म्हणून लोकप्रिय आहेत.

पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर विविध पातळीवर तपास सुरू असतानाच लोकप्रिय युट्यूबर ज्योती मल्होत्राला पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणा आयएसआयसाठी हेरगिरीप्रकरणी अटक केली. आणखी काही जणांना याच संदर्भात अटक केली आहे. ज्योती मल्होत्रा आणि इतर सर्व युट्यूबर किंवा सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर यांचा विचार करता त्यांनी पैसे मिळवण्यासाठी या सर्व गोष्टी केल्या हे उघड आहे. पण यानिमित्ताने पाकिस्तानच्या आयएसआय या गुप्तहेर संघटनेची एक वेगळी योजना समोर आली आहे हे सर्वात जास्त महत्त्वाचे आहे. पाकिस्तानच्या आयएसआयच्या माध्यमातून देशात हेरगिरी केली जाते हे काही नवीन नाही. देशाच्या कानाकोपर्यामध्ये महत्त्वाच्या शहरांमध्ये स्लीपर सेल डेव्हलप करून त्यांच्या माध्यमातून माहिती मिळवण्याचे आणि दहशतवादी हल्ल्याच्या वेळी सहाय्य घेण्याचे कामही केले जाते, असे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. कोणत्याही देशाची गुप्तहेर संघटना इतर देशांमध्ये आपल्या संघटनेच्या माध्यमातून गुप्त माहिती मिळवण्याचे काम करतच असते. देशात आयएसआय संघटनेचे अधिकृत एजंटही असे अधूनमधून पकडले जात असतात. पण ते शिक्षित एजंट असतात. ज्या प्रकारे सोशल मीडियाचा वापर करणाऱ्या आणि लोकप्रिय झालेल्या काही महत्त्वाच्या इन्फ्लुएन्सर्सचा हेरगिरीसाठी वापर करण्याची रणनीती आयएसआयने आखली आहे, त्याचा विचार आता गांभीर्याने करावा लागणार आहे. अनेक वेळा हे सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स आपल्या लोकप्रियतेच्या किंवा त्यांना मिळणाऱ्या लाइक्स आणि कॉमेंटच्या भरामध्ये वाहून जातात आणि आपण कशा प्रकारचा कार्यक्रम पेश करत आहोत याचे त्यांना भानही राहात नाही. आपण शत्रू राष्ट्राच्या ट्रॅपमध्ये अडकत आहोत त्याची कल्पनाही त्यांना येत नाही. ज्या प्रकारे हनी ट्रॅपचा वापर करून सरकारी अधिकारी किंवा दूतावासातील कर्मचारी यांना अडकवले जाते आणि त्यांच्याकडून महत्त्वाची माहिती मिळवली जाते, त्याच प्रकारे आता या सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सचा वापरही आयएसआयकडून केला जात आहे. भारतासारख्या लोकशाही देशामध्ये सोशल मीडिया वापरकर्ते जेव्हा सरकार विरोधी किंवा देश विरोधी भूमिका घेतात तेव्हा त्याला काही प्रमाणात लाइक्स आणि कॉमेंट्सही मिळतात. अशाप्रकारे भारत विरोधी किंवा सरकारच्या धोरणाविरोधी भूमिका घेणाऱ्या सोशल मीडियाच्या शोधातच पाकिस्तानची आयएसआय गुप्तहेर संघटना आहे असे दिसते.

ज्योती मल्होत्राला अटक केल्यानंतर जो तपास झाला त्यामध्ये जी माहिती समोर आली आहे त्यामध्ये अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने ज्योतीला पाकिस्तानची हेर म्हणून तयार करण्यात आले हे दिसत आहे. ज्योती मल्होत्राने गेल्या काही महिन्यांमध्ये अनेक वेळा पाकिस्तानचा प्रवास केला आणि पर्यटक म्हणून तेथील काही चित्रण आपल्या युट्यूब चॅनेलवर प्रदर्शित केले. या एका कारणामुळे ज्योतीवर कारवाई करण्यात आलेली नाही. तर अत्यंत जाणीवपूर्वक ती पाकिस्तानच्या गुप्तहेर संघटनेसाठी काम करत होती असेही लक्षात आले आहे.

महत्त्वाची गोष्ट अशी आहे की देशातील जो अधिकृत मीडिया आहे म्हणजे वृत्तपत्रे किंवा वृत्तवाहिन्या त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या यंत्रणा आहेत आणि सरकारी यंत्रणाही आहेत. पण या सोशल मीडियावर कंटेंट क्रिएट करणाऱ्या लोकांवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. गेल्या काही कालावधीमध्ये वादग्रस्त वक्तव्य किंवा वादग्रस्त कार्यक्रम सादर करून अडचणीत आलेल्या सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सचा विचार केला, तर आपण काय सादर करत आहोत त्याचे भान त्यांना राहात नसल्याने हे सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स अडचणीत येऊ लागले आहेत. सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सना केवळ अटक करून या विषयाला पूर्णविराम मिळणार नाही तर देश विरोधी वातावरण तयार करण्यासाठी जाणीवपूर्वक पाकिस्तानमधून काही मदत मिळते आहे का हे पाहणेसुद्धा महत्त्वाचे ठरणार आहे. सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरचा हा इन्फ्लुएन्स स्लिपर सेल प्रमाणे देशासाठी घातक ठरणार आहे का हे आता पहावेच लागणार आहे.

# मटका घेणारे व खेळणारे १६ जनाविरुद्ध गुन्हा दाखल

**अंबड । प्रतिनिधी**

**उप विभागीय पोलीस अधिकारी व अंबड पोलीस ठाणा पथक यांनी अंबड हद्दीमध्ये विविध ठिकाणी मटका जुगार अड्ड्यावर एकाच वेळी छापे टाकून चार गुन्हे मध्ये एकूण १६ आरोपी विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आला यामध्ये मटका घेणारे व खेळणारे या दोघांचाही समावेश आहे या कारवाईमुळे अंबड शहरातील इतर काही मटका घेणारे व खेळणारे पळून गेले. या कारवाईमध्ये एकुण ६४,५३०/- रुपयेचा मुद्देमाल जप्त करुन एकुण १६ आरोपींवर ०४ गुन्हे दाखल करण्यात आले सदरील कारवाई पोलीस अधीक्षक व अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या आदेशावरून अंबड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल गोरले यांच्यासह त्यांच्या पथकाने कारवाई केली.**

पोलीस ठाणे अंबड हद्दीत २१मे रोजी गोपनिय बादमीदाराकडुन माहीती मिळाली कि, प्रॉपर अंबड हद्दीमध्ये विविध ठिकाणी मटका जुगार चालु असल्याची माहीती मिळाल्याने सदरबाबतची माहीती उपविभागीय पोलीस अधिकारी यांना देवून आम्ही सपोनि गुरले सोबत पो.हे.कॉ. फलटणकर, पो.शि.भिसे, गुंढे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी उप विभाग अंबड येथील पो.हे.कॉ. गायके, पो.ना. जाधव, घोडके, पो.शि. राऊत, देशमाने असे पथक बनवुन संयुक्तीकपणे अंबड शहरातील सरकारी दवाखाना रोड, नाथ्रेकर चौक, महाराष्ट्र वेस, देशी रोड या ठिकाणी छापा मारुन मटका जुगार खेळत व खेळवित असलेले आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडुन मटक्याच्या साहीत्यासह एकुण ६४,५३०/- रुपयेचा मुद्देमाल जप्त करुन सदरबाबत अंबड पोलीस ठाणे येथे आरोपीतांवर कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये विविध ०४ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. सदरची कामगीरी मा.श्री अजय कुमार बंसल पोलीस अधिक्षक मा.श्री अयुष नोपाणी अपर पोलीस अधिक्षक , उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे अंबड प्रभारी अधिकारी अमोल गुरले सहा. पोलीस निरीक्षक, पो.हे.कॉ. फलटणकर, पो.शि.भिसे, गेंढे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी उप विभाग अंबड येथील पो.हे.कॉ. गायके, पो.ना.जाधव, घोडके, पो.शि. राऊत, देशमाने यांनी पार पाडलेली आहे.

# दिव्यांगासाठी सुविधा उपलब्ध करून देणार

**जालना । प्रतिनिधी**

आ.अर्जुन खोतकर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब जी घुगे शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाच फुले यांच्या मार्गदर्शनाखाली. २२ मे रोजी जिल्हा सामान्य रुग्णालयाचे. जिल्हा शल्य चिकित्सक राजेंद्र पाटील यांनी दिव्यांगासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयातील विविध समस्या सोडण्यासाठी व दिव्यांगाची तपासणी लवकरच दोन दिवसात करण्यात येणार आहे. तसेच दिव्यांगांसाठी स्वतंत्र खिडकी योजना यासाठी जागा उपलब्ध झाली की तातडीने मंजूर करण्यात येईल. दिव्यांगांसाठी बसण्याची सुविधा करण्यात येईल.आणि पिण्याच्या पाण्याची करण्यात येणार आहे. आणि जे दिव्यांग खाटावर आहेत. आशा दिव्यांगांना घरपोच अंबुलन्स सेवा करण्यात येईल व त्यांची तपासणी करून त्यांना प्रमाण दिव्यांग प्रमाणपत्र देण्यात येईल असे आश्वासन जिल्हा शैल्य चिकित्सक श्री राजेंद्र पाटील यांनी दिले. यावेळी शिवसेना दिव्यांग आघाडी जिल्हा संघटक अनिल मगदूले. दशरथ तोंडोळे. शेख इस्माईल रंगनाथ शिंदे पाटील अनिल महापुरे शेख रशीद जावेद बागवान. हो शेख जावेद. आदी उपस्थित होते




## देवकन्या गहेराव यांचे निधन

**जालना । प्रतिनिधी**



बदनापूर तालुक्यातील सेलगाव येथील रहिवाशी देवकन्या बालाराम गहेराव (७०) यांचे २२मे गुरुवारी रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर सेलगाव येथील स्मशानभुमीत सायंकाळी ७ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सूना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. पाथ्री (ता. फुलंब्री) येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील प्रा. डॉ. युवराज गहेराव यांच्या त्या मातोश्री होत.

## दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना सर्व प्रमाणपत्र आपल्या दारी' मिळणार

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ या कायद्याची अंमलबजावणी होण्यासाठी इयत्त १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशासाठी लागणारे आवश्यक प्रमाणपत्रे विहित वेळेत मिळण्यासाठी ''दाखला आपल्या दारी'' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. नुकतेच इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशासाठी लागणारे आवश्यक प्रमाणपत्रे उदा. वय अधिवास व रहीवास प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र, रहीवासी प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना वेळेत मिळण्यासाठी व प्रवेश सुरु झाल्यावर होणारी संभाव्य गर्दी टाळण्यासाठी ''दाखला आपल्या दारी'' हा उपक्रम जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत दि. २६ ते २७ मे, २०२५ पर्यंत राबविण्यात येणार असल्याचे उपजिल्हाधिकारी यांच्याकडून कळविण्यात आले आहे.

## संजय सिरसट यांच्या नागरी सत्कार सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहा-बाबासाहेब वाघमारे

**वडवणी । प्रतिनिधी**



माजलगाव येथे सामाजिक न्यायमंत्री ना. संजय सिरसट यांच्या नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे तरी वडवणी शहरासह तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बहुजन विकास मोर्चाचे वडवणी तालुकाध्यक्ष बाबासाहेब वाघमारे यांनी केले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, राज्याचे सामाजिक न्याय मंत्रीपदी तथा छत्रपती संभाजी नगरच्या पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल ना.संजय सिरसठ यांच्या नागरी सत्काराचे आयोजन माजलगाव येथे दिनांक २४ मे २०२५ रोजी दुपारी ठिक ४-०० वाजता जूना मोंढा येथे बहुजन समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमास वडवणी तालुक्यासह शहरातील युवक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बहुजन विकास मोर्चाचे वडवणी तालुकाध्यक्ष बाबासाहेब वाघमारे यांनी केले आहे. या कार्यक्रमास बहुजनांचे नेते तथा बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे,आमदार प्रकाश सोळंके, आमदार धनंजय मुंडे,आमदार सुरेश धस,आमदार विजयसिंह पंडित,शिवसेनेच्या नेत्या हर्षदा सिरसठ यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. विविध उपक्रमांनी व मोठ्या उत्साहात सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसठ यांचा नागरी सत्कार संपन्न होणार आहे.

## पाटोद्यात त्या व्हायरल व्हिडिओमुळे खळबळ

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील नाळवंडी येथील ग्रामसेवकांनी पैसे घेतल्याचा व्हीडिओ गुरुवारी प्रचार माध्यमांवर व्हायरल झाल्यामुळे पाटोदा तालुक्यात एकच खळबळ उडाली असून पैसे घेणारा तो 'ग्रामसेवक,कोण याची मोठी चर्चा पाटोदा तालुक्यात होऊ लागलेली असुन निगरगट्ट प्रशासनाने आता तरी दोषींवर कारवाई करावी म्हणून तो व्हिडिओ शुट केला असल्याचे अशोक पठाडे यांनी बोलताना सांगितले.तसेच सार्वजनिक कामांसाठी देखील लोकांकडून पैसे घेत असल्याची तक्रार नाळवंडी येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक पठाडे यांनी प्रशासनाकडे केली होती.

## पान १ वरून...

### बोगस बियाण्याचे

आणि गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले, त्याबद्दल राज्य सरकारकडून काही भूमिका आली नसल्याचे वडेट्टीवार म्हणाले. दरम्यान, राज्यात बोगस बियाणे आणि खत लिंकिंगने शेतकऱ्यांची लूट केली जात आहे. यावरून खरीप आढावा बैठकीत प्रशासनाला सूचना दिल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच चांगले बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांनी सारथी पोर्टलची मदत घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

----------------

### पंतप्रधानांचे पुन्हा एकदा

आणि परराष्ट्रमंत्री रुबियो यांनी अमेरिकेच्या भूमिकेबाबत वारंवार दावे केले, तरी आपण त्यावर गप्प का आहात?''

**बिकानेरमध्ये काय म्हणाले मोदी ?**

बिकानेरमधील जाहीर सभेत पंतप्रधान मोदी म्हणाले, ''राजस्थानची ही वीरभूमी आपल्याला शिकवते की देश आणि देशवासीयांपेक्षा मोठे काहीही नाही. २२ एप्रिलला दहशतवाद्यांनी धर्म विचारून आपल्या बहिणींच्या कपाळावरील सिंदूर पुसले. पहलगाममध्ये त्या गोळ्या झाडल्या गेल्या, पण त्या १४० कोटी देशवासीयांचे हृदय भेदून गेल्या. त्यानंतर प्रत्येक भारतीयाने एकजुटीने दहशतवाद्यांना मातीत मिसळण्याचा संकल्प घेतला. पंतप्रधान पुढे म्हणाले, राजस्थानच्या भूमीवरून मी नम्रपणे देशवासीयांना सांगू इच्छितो की, ज्यांनी सिंदूर पुसण्याचा प्रयत्न केला, त्यांना मातीत मिसळले आहे. जे भारताचे रक्त सांडत होते, त्यांचा कणाकणाचा हिशेब चुकवला आहे. ज्यांना वाटले भारत गप्प बसेल, ते आज घरात लपून बसले आहेत. जे त्यांच्या शस्त्रांवर गर्व करत होते, ते आज ढिगाऱ्याखाली दबले आहेत.

----------------

### बीड पोलीस दलात मोठा फेरबदल

बनला होता आणि यामुळे पोलीस खात्यावर सातत्याने आरोप होत होते. अनेक कर्मचारी अनेक दिवसांपासून एकाच ठिकाणी कामावर होते. यावर टिका करण्यात येत होती. याशिवाय अनेक कर्मचाऱ्यांनी बदलीसाठी अर्ज केले होते. या सगळ्या पार्श्वभुमीवर पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बदल्यांचा कठोर निर्णय घेतला. बदली झालेल्या ६०६ कर्मचाऱ्यांमध्ये अंमलदारांचा समावेश आहे. पोलीस अधीक्षक यांनी बदल्यांचे धोरण कठोरपणे राबवले आहे. ज्या भागात पोलीस कर्मचारी राहतात, त्या भागातून त्यांची बदली दुसऱ्या तालुक्यात करण्यात आली आहे. यामुळे कोणत्याही प्रकारे गैरप्रकार किंवा चुकीचे काम होणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली आहे. या निर्णयामुळे पोलीस दलात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

--------

### बीड शहरातील नागरी समस्या

जेसीबी व कम्पॅक्टर खरेदी करून स्वच्छतेसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली. शहरातील अनेक भागांमध्ये पथदिवे बंद अवस्थेत आहेत तर काही भागांत दिवसा दिवे सुरू असतात. हायमास्ट दिव्यांचीही अवस्था दयनिय असून, त्यांची त्वरित दुरुस्ती आवश्यक आहे. सौर ऊर्जेचा वापर वाढवून मिनी हायमास्ट दिवे, स्मशानभूमीत प्रकाशयोजना व नगरपरिषद इमारतीवर सौर प्रकल्प बसविण्याचेही सुचविण्यात आले. पाणी पुरवठा विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर व्हावे, माजलगाव व बिंदुसरा प्रकल्पाच्या मदतीने नव्या पाणी योजनांचा प्रस्ताव तयार करून शासनाला सादर करावा, अशा सूचना शिष्टमंडळाने केल्या. श्रीरामनगर येथील जुन्या पाण्याच्या टाकीऐवजी नवीन टाकी उभारण्याची, तसेच अनधिकृत नळजोडण्या नियमित करून कराच्या कक्षेत आणण्याची मागणी करण्यात आली. बांधकाम विभागाच्या कामांबाबतही विविध सूचना देण्यात आल्या. यशवंत नाट्यगृह, आंबेडकर सांस्कृतिक भवन यांची दुरुस्ती करावी, प्रमुख चौकांचे सुशोभीकरण करावे, नव्या भाजी मंडई व गाळ्यांचे बांधकाम पूर्ण करून सुरू करावे, तसेच रस्त्यांवरील खड्डे, सिमेंट रोडच्या सांधेबांध तातडीने कराव्यात. बेघर महिला निवारा गृह व नव्या स्मशानभूमीची उभारणी गरजेची असल्याचे सांगण्यात आले. आरोग्य विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे अपुरी पडत असल्याने नव्या केंद्रांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशी सूचना करताना पेठ बीड, शाहूनगर भागांसाठी आरोग्य केंद्रांची गरज अधोरेखित करण्यात आली. कर वसुलीसाठी डिजिटल पद्धतीचा वापर करून गुगल पे, गुगल पेसारखी ॲप विकसित करावी, तसेच व्यवसायिक गाळ्यांची नव्याने नोंदणी करून नगरपरिषदेला उत्पन्न वाढवण्याचा सल्ला देण्यात आला. शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार फायर ब्रिगेडची नवी वाहने, भुयारी गटार योजना व एसटीपीसाठी जागा निश्चित करणे, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण व मियावाकी पद्धतीने दाट लागवड करणे अशाही सूचनांचा समावेश निवेदनात करण्यात आला. शहरातील नागरिकांनी वारंवार मांडलेल्या या समस्या तातडीने सोडवण्यात याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने केली आहे. यावेळी माजी नगरसेवक बाबुराव दुधाळ, गणेश वाघमारे, भीमराव वाघचौरे, नरसिंग नाईकवाडे, सादेक जमा, भास्करराव जाधव, इकबाल शेख, विकास जोगदंड, प्रेम चांदणे, सतिश पवार, राणा चौहान, मुन्ना इनामदार, रवींद्र कदम, शुभम धुत, जैतुल्ला खान, बिभीषण लांडगे, नितिन साखरे, दत्ता जाधव, नसीर अन्सारी, बाळासाहेब आंबेकर, साऊद भाई, महेश गर्जे, नागेश तांबारे, मंगेश धोंगडे, विनोद हातागळे, डॉ.रमेश शिंदे, विठ्ठल गुजर, गजानन जवकर, शुभम कातांगळे, नामदेव गायकवाड, विशाल राऊत, भीमराव दळे, दगडू म्हेत्रे, प्रकाश कानगावकर, विद्याभूषण बेदरकर, जाफर इनामदार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, नगरपरिषदेचे सर्व विभागाचे प्रमुख, नागरिक उपस्थित होते.

----------------

### महाराष्ट्रात मान्सूनपूर्व

जाण्याची शक्यता आहे. मेघगर्जनेसह मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज आहे. हवामान विभागाने पुढील चार दिवसांसाठी राज्यात जोरदार पावसाचा इशारा दिला आहे. २३ मे रोजी रायगड आणि रत्नागिरीला रेड अलर्ट, तर मुंबई, ठाणे, पालघर, पुणे, नगर, संभाजीनगर, नाशिक आणि सिंधुदुर्ग यांना ऑरेंज अलर्ट आहे. उर्वरित भागांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. शनिवार आणि रविवारी (२४-२५ मे) कोकण किनारपट्टीवर ऑरेंज अलर्ट, तर उर्वरित राज्यात यलो अलर्ट कायम राहील. कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पुढील तीन-चार दिवस पाऊस धुमाकूळ घालणार आहे. ठाण्यात, मुंबई आणि पालघरमध्ये अतिवृष्टी होईल. रायगड आणि रत्नागिरीत २५ मेपर्यंत पावसाचा जोर कायम राहील, तर सिंधुदुर्गात सलग पाच दिवस अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. पुणे, सातारा, अहिल्यानगर आणि कोल्हापूरच्या घाट परिसरात दोन दिवस ऑरेंज अलर्ट आहे. मराठवाड्यात परभणी, बीड, नांदेड आणि लातूर येथे तर छत्रपती संभाजीनगरमध्ये शुक्रवारी मुसळधार पावसासाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. अंदाजानुसार, पुढील २-३ दिवसांत केरळमध्ये मान्सून दाखल होण्यासाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. पूर्वमध्य अरबी समुद्रात सध्या नैऋत्य मोसमी पावसाचे वातावरण तयार होत असून, कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाला आहे. यामुळे कोकण, गोवा, कर्नाटक आणि केरळमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

----------

### गेवराई येथील अवैद्य गर्भलिंग निदान

डॉ. मोहम्मद मुक्ती ताहेर नोमानी यांनी गेवराई पोलीस ठाण्यात तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक बडे, बीड जिल्हा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेखा धस व त्यांच्या सहकाऱ्यांनी गुप्त माहिती आधारे आरोपी मनीषा सानप रा. ताकडगाव ता. गेवराई यांची टोळी लोकांकडून मोठी रक्कम घेऊन गर्भवती महिलांच्या गर्भाचे अवैधरित्या गर्भलिंग निदान करत आहेत अशी माहिती मिळ्यानुसार सदर प्रकरणाची खात्री करण्यासाठी आरोग्य व पोलीस पथकाच्या वतीने डमी ग्राहक पाठविण्यात आला व छापा मारण्यासाठी सापळा रचण्यात आला .डमी ग्राहकांनी इशारा करताच अवैध गर्भलिंग निदान स्थळी आरोग्य व पोलीसांकडून छापा मारण्यात आला व श्रीमती मनीषा सानप व चंद्रकांत चंदनशिव यांना ताब्यात घेण्यात आले अन्य आरोपी सतिश गवारे पळून गेला. तद्नंतर छापा स्थळाची झडती घेण्यात आली असता काही आक्षेपार्ह साधने व औषधे आढळून आले डॉ. नोमानी यांच्या फिर्यादीनुसार गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा नंबर ९ /२०२४ कलम ३१२, ३४, १२० ब भादवी कलम तीन-चार वैद्यकीय गर्भपात अधिनियम कलम तीन (एक) (तीन) (अ) सहा (ब) (क) अठरा, तेवीस (एक) (दोन) पीसीपीएनडीटी कायद्यान्वये आरोपी सतिश गवारे, मनीषा सानप आणि चंद्रकांत चंदनशिवे यांच्या विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला व गेवराई पोलीसांकडून आरोपी विरुद्ध न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. सदरचे दोषारोपपत्र रद्द करण्यात यावे अशी याचिका आरोपी सतीश गवारे आणि चंद्रकांत चंदनशिवे यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात प्रसिद्ध विधीज्ञ अँड. राजेंद्र हंगे, अँड.अनिरुध्द हांगे, अँड.हर्षवर्धन हांगे यांच्या मार्फत दाखल केली. सदर प्रकरणाची सुनावणी माननीय न्यायमूर्ती वि.भा कंकणवाडी आणि न्यायमूर्ती माननीय संजय देशमुख यांच्यासमोर झाली यावेळी याचिकाकर्त्यांच्या वतीने अँड. राजेंद्र हांगे, अँड . अनिरुद्ध हांगे, अँड. हर्षवर्धन हांगे यांनी युक्तिवाद करतांना भादवी कलमानुसार गुन्हा घडल्याचा कोणताही पुरावा दोषारोप पत्रात नाही तसेच पी सी पी एन डी टी कलमानुसार पोलीस न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करू शकत नाहीत त्यामुळे हे दोषारोपपत्र रद्द करण्यात यावे असा युक्तिवाद बचाव पक्षाच्या वतीने करण्यात आला.बचाव पक्षाचा युक्तीवादा ग्राह्य धरून माननीय न्यायमूर्तीने उपरोक्त प्रकरणाचे दोषारोप पत्रच रद्द करण्याचा आदेश दिला.

--------

### तास्मॅकवरील छाप्यावरून सर्वोच्च

जनरल एस.व्ही. राजू यांना फटकारले. सरन्यायाधीश बी आर गवई म्हणाले की, राज्य महामंडळाविरुद्ध ईडीच्या कारवाईने देशाच्या संघराज्य रचनेचे उल्लंघन केले आहे. तुम्ही देशाच्या संघराज्य रचनेचे पूर्णपणे उल्लंघन करत आहात, असेही यावेळी सुनावले. एप्रिलमध्ये मद्रास उच्च न्यायालयाच्या ईडीच्या चौकशीला आणि महामंडळावरील छाप्यांना स्थगिती देण्याच्या आदेशाविरुद्ध तामिळनाडू राज्य आणि तास्मॅक यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयात सुनावणीवेळी वरील भाष्य केले. तास्मॅकचे ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी म्हणाले की, कर्मचाऱ्यांचे फोन क्लोन केले गेले आहेत. गोपनीयता नावाची एक गोष्ट असते, असेही यावेळी सांगितले. तामिळनाडूचे वकील कपिल सिब्बल म्हणाले की, भ्रष्टाचाराच्या आरोपांवरून राज्यानेच दारू दुकानचालकांविरुद्ध ४१ एफआयआर नोंदवले आहेत. ईडीने २०२५ मध्ये घटनास्थळी प्रवेश केला आणि तेथे सापडलेले फोन आणि उपकरणे जप्त करण्यासाठी तास्मॅकच्या मुख्यालयावर छापा टाकला. पुढे सर्वोच्च न्यायालय सवाल करत म्हणाले की, महामंडळाविरुद्ध फौजदारी गुन्हा कसा ठरवता येईल? गुन्हेगारी प्रकरणात तुम्ही व्यक्तींविरुद्ध पण महामंडळाविरुद्ध एफआयआर नोंदवू शकता? असा सवालही केला. राजू यांनी बचाव केला की, तपासात १००० कोटी रुपयांचा घोटाळा झाला होता. त्यांनी सांगितले की, राजकारणी या प्रकरणात सहभागी होते. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने सवाल केला की, राज्य सरकारने अनेक एफआयआर दाखल केले असूनही ईडीला हस्तक्षेप का करावा लागला. खंडपीठाने ईडीला कोणत्या गुन्ह्यामुळे कारवाई करावी लागली याबद्दल विचारणा केली. त्यावर राजू यांनी सर्वोच्च न्यायालयाकडे सविस्तर उत्तर दाखल करण्यासाठी वेळ मागितला. त्यांना उत्तर दाखल करण्यासाठी पंधरा दिवसांचा वेळ देण्यात आला.

------------

### भारतीय जैन संघटना, जलसंपदा

स्वच्छता आणि खोलीकरणाचे काम आ.संदीप क्षीरसागरांच्या पुढाकारातून आणि नगरपालिकेच्या माध्यमातून युध्दपातळीवर सुरू आहे. नदीपात्राची मान्सूनपूर्व स्वच्छता आणि खोलीकरण केल्याने मोठ्या प्रमाणात पाणी साठवणूक तर होणारच आहे, शिवाय शहरात असलेला पुराचा धोकाही मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. पाऊस सुरू होण्यापूर्वी सदरील काम पुर्ण होण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर, माजी आ.सय्यद सलीम स्वतः कामाच्या ठिकाणी उभे राहून काम करून घेत आहेत. दरम्यान या कामासाठी योगदान म्हणून भारतीय जैन संघटना, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन आदींनी स्वेच्छेने जेसीबी, ट्रॅक्टर इत्यादी साधनसामग्री निःशुल्क उपलब्ध करून दिली आहे. निश्चीतच यामुळे कामाची गती वाढणार असून, काम वेळेत आटोपण्यासाठी मोठी मदत होणार आहे. त्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी योगदान दिलेल्या भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष श्री.शांतीलाल मुथ्था, जलसंपदा विभाग, नाम फाउंडेशन यांसह सर्व शासकीय आणि अशासकीय संस्था, संघटनांचे आभार व्यक्त केले आहेत.

------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि. २३ मे २०२५

३


## परदेशी शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज करण्यास ६ जूनपर्यंत मुदतवाढ

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज), इतर मागास वर्ग (इमाव) आणि विशेष मागास प्रवर्ग (विमाप्र) मधील विद्यार्थ्यांसाठी परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १७ मे २०२५ अशी होती. ही मुदत वाढवून ६ जून २०२५ पर्यंत करण्यात आली आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी परदेश शिक्षण शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले आहे.

परदेशातील क्यूएस () रँकिंग २०० मधील परदेशी संस्थांमध्ये २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदवीका तसेच पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या ७५ विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती मंजूर केली जाते. ही शिष्यवृत्ती शाखानिहाय व अभ्यासक्रमनिहाय दिली जाते. परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्जाचा नमुना, शासन निर्णय, शिष्यवृत्तीसाठी पात्रतेच्या अन्य महत्त्वाच्या अटी व शर्ती इत्यादी सविस्तर माहिती विभागाच्या ... किंवा ://... या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज या संकेतस्थळावरुन डाउनलोड करून, परिपूर्ण अर्ज आवश्यक कागदपत्रांसह ६ जून २०२५ रोजी सायंकाळी ०६.१५ वाजेपर्यंत समक्ष किंवा पोस्टाने इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, आकार प्रिमायसेस, दुसरा मजला, एम. एच. बी. कॉलनी, म्हाडा कमर्शिअल कॉम्प्लेक्स समतानगर, येरवडा पुणे-४११००६ येथे दोन प्रतीत सादर करावा.

# शासकीय कामात अडथळा, सहा जणांवर गुन्हा दाखल

## रस्ता मोकळा करण्याच्या कारवाईला केला होता उग्र विरोध

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील धारूर तहसील कार्यालयाच्या आदेशानुसार महसूल विभागाने शेतकऱ्यांसाठी असलेल्या रस्त्यावरचे अतिक्रमण काढून रस्ता मोकळा करून घेत असताना स्थानिक अतिक्रमण धारकांकडून उग्र विरोध झाल्याची घटना समोर आली आहे. यामध्ये महसूल पथकावर आक्षेपार्ह वर्तन करत सरकारी कामात अडथळा आणण्यात आला. या प्रकरणी धारूर पोलीस ठाण्यात सहा आरोपींविरोधात विविध गंभीर गुन्ह्यांखाली एफआयआर नोंदविण्यात आली आहे.**

या घटनेने शासकीय कामात अडथळा आणणाऱ्या प्रवृत्ती विरोधात कठोर पावले उचलण्याची गरज अधोरेखित केली आहे. स्थानिक प्रशासनाने अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणखी ठोस उपाययोजना कराव्यात, तसेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित दादा पवार , राज्याचे महसूल मंत्री ना.बावनकुळे साहेब तसेच जिल्हाधिकारी बीड यांनी या प्रकरणात लक्ष घालून रस्त्यापासून वंचित शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने होत आहे. यापुढील काळात शेतकऱ्यांचा रस्ता मोकळा करण्याविषयी प्रकरणांवर प्रशासन कशी कार्यवाही करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

धारूर येथील सर्वे नंबर ६२८ या जमिनीत जुना रस्ता असून काही शेतकरी व नागरिकांनी हा रस्ता अडविलेला आहे. यासंदर्भात रस्त्यापासून वंचित शेतकऱ्यांनी रीतसर अर्ज दिलेले होते त्यावर रस्ता मोकळा करण्याविषयी मा. तहसीलदार धारुर यांनी आदेश पारित केलेले आहे, महसूल विभागाने पूर्वीच आदेश व नोटीस बजावल्या होत्या. विशेष म्हणजे दि. २१ फेब्रुवारी २०२२ रोजी तहसीलदार कार्यालय धारूर यांनी अतिक्रमण हटवण्याचा स्पष्ट आदेश काढला होता. त्यानंतर दि. २८ एप्रिल २०२५ रोजी पुढील अधिसूचना काढून संबंधितांना वेळेत अतिक्रमण हटवण्याची सूचना दिली होती. मात्र, आदेशाकडे दुर्लक्ष करत त्यांनी अतिक्रमण तसेच ठेवले व शेतकऱ्यांचे रस्त्याची अडवणूक सुरूच ठेवली . दि. २० मे रोजी दुपारी ३ ते ५ दरम्यान तहसीलदारांच्या आदेशानुसार मंडळ अधिकारी कपिलकुमार गोडसे, ग्रामविकास अधिकारी लक्ष्मण मुळे, आणि धारूर पोलिस स्टेशनचे उपनिरीक्षक व इतर पोलीस कर्मचाऱ्यांसह जेसीबीच्या साहाय्याने रस्ता मोकळा करण्याची कारवाई सुरू करण्यात आली. रस्ता मोकळा करण्यासाठी मोजणीचे खुणांकन सुरू होते.कारवाई सुरू होताच उत्तम मुंजाबा शिंदे, तय्यब अब्दुल शेख, अस्लम तय्यब शेख, नवनाथ मुंजाबा शिंदे, रंजना श्रीराम मुंडे आणि उत्तम शिंदे यांची पत्नी (नाव अज्ञात) यांनी उग्र विरोध सुरू केला व काहीजण जेसीबी समोर येऊन उभे राहिले त्यांनी कारवाईला विरोध करत सांगितले की, ''हे प्रकरण कोर्टात सुरू आहे.'' अधिकारी व पोलिसांनी त्यांच्याकडे कोणतीही स्थगनाची आदेशपत्रे किंवा वरिष्ठांचे स्टे ऑर्डर किंवा न्यायालयीन निर्णय आहेत का, याची विचारणा केली असता त्यांनी कोणतेही




पुरावे सादर केले नाहीत. या गोंधळात आरोपींनी सरकारी कामात अडथळा निर्माण करत ग्रामविकास अधिकारी मुळे यांच्याकडील मोजणी टेप जबरदस्तीने हिसकावून घेतला, तसेच त्यांना धक्काबुक्की केली. आरोपी नवनाथ शिंदे याने उत्तम शिंदेला फोन करून ''जेसीबी हलवू देऊ नका, काय व्हायचं ते होऊ द्या'' असे सांगितल्याची माहितीही समोर आली आहे. फिर्यादी मंडळ अधिकारी कपिलकुमार गोडसे यांच्या तक्रारीवरून धारूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र. ०१८३ अंतर्गत भारतीय न्याय संहिता (२०२३) चे कलम ११५(२) , १२६ (सरकारी कामात अडथळा), १३२ , १८९(२), १९०, आणि १९१(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवाजी रानाबा सरजे यांच्या कडे सोपवण्यात आला आहे.सरकारच्या आदेशानुसार रस्ता मोकळा करण्यासाठी अधिकारी प्रयत्नशील होते. मात्र, स्थानिकांनी उग्र विरोध करून प्रशासनाच्या कायदेशीर कामकाजात अडथळा निर्माण केला, हे अत्यंत गंभीर स्वरूपाचे आहे. यामुळे महसूल विभागाचे अधिकाऱ्यांना दिलेला पोलीस संरक्षण असूनही कारवाई अर्धवट सोडावी लागली. एकीकडे शासन शेतकऱ्यांना रस्ता देण्याविषयी अत्यंत सकारात्मक असून त्याविषयी अनेक मोहिमे राबविली जात आहे परंतु आजही अनेक शेतकरी रस्त्यापासून वंचित आहोत व काही आडमुठ लोकांचे हटधरमी मुळे अनेक शेतकरी त्रस्त आहेत. या घटनेने शासकीय कामात अडथळा आणणाऱ्या प्रवृत्ती विरोधात कठोर पावले उचलण्याची गरज अधोरेखित केली आहे. स्थानिक प्रशासनाने अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणखी ठोस उपाययोजना कराव्यात, तसेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजित दादा पवार , राज्याचे महसूल मंत्री ना.बावनकुळे साहेब तसेच जिल्हाधिकारी बीड यांनी या प्रकरणात लक्ष घालून रस्त्यापासून वंचित शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने होत आहे. यापुढील काळात शेतकऱ्यांचा रस्ता मोकळा करण्याविषयी प्रकरणांवर प्रशासन कशी कार्यवाही करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सुतार समाजातील दहावी व बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार गुणगौरव

## जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करून सहभागी व्हावे-बापूराव भालेकर

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील सुतार समाजातील दहावी व बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा बीड जिल्हा विश्वकर्मा जयंती उत्सव समितीच्या वतीने २६ मे २०२५ रोजी विश्वकर्मा मंदिर तळेगाव, बीड येथे गुण गौरव करण्यात येणार असून, यासाठी जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी आपल्या गुणपत्रिकेसह नाव नोंदणी करून सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा सुतार समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष बापूराव भालेकर यांनी केले आहे.**

विश्वकर्मा सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२५ च्या माध्यमातून विविध समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन केले जात आहे. यासाठी समाजातील दानशूर व्यक्तीचा मोठा सहभाग मिळत आहे. विश्वकर्मा जयंती उत्सव समितीच्या* प्रयत्नाने प्रत्येक महिन्याच्या अमावस्याला प्रभू विश्वकर्मा पूजन व महाप्रसादाचे आयोजन केले जाते . येत्या २६ मे २०२५ रोजी समाजातील उद्योगपती गंगाधरराव आगलावे यांच्या वतीने विश्वकर्मा पूजन व महाप्रसादाचे आयोजन केले आहे.याच दिवशी समाजातील दहावी आणि बारावी परीक्षा २०२५ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. गुणानुक्रमे इयत्ता दहावी व बारावी मधील पहिल्या तीन विद्यार्थ्यांना उद्योगपती समाजभूषण गंगाधरराव आगलावे यांचे वतीने पारितोषिक देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक कै.राधाबाई दशरथ आगलावे यांच्या स्मरणार्थ रोख रक्कम ईयत्ता दहावी २५०१ रु. बारावी २५०१ रुपये, द्वितीय पारितोषिक कै.दशरथराव कृष्णाजी आगलावे यांच्या स्मरणार्थ रोख रक्कम ईयत्ता दहावी १५०१ रु. बारावी १५०१ रुपये, तृतीय पारितोषिक कै.किशोर गंगाधरराव आगलावे यांच्या स्मरणार्थ रोख रक्कम ईयत्ता दहावी ११०१ रु. बारावी ११०१ रुपये, तसेच ७५% पेक्षा जास्त गुणवत्ताधारक इयत्ता दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांचा सत्कार व सन्मानपत्र देऊन जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात येणार आहे. सदरील कार्यक्रम दि. २६ मे २०२५ रोजी प्रभू विश्वकर्मा मंदिर, नगर रोड तळेगाव बीड. या ठिकाणी होणार आहे. बीड जिल्ह्यातील तमाम सुतार समाज बांधवांना आवाहन करण्यात येत आहे की, आपल्या मुलांच्या कौतुक सोहळ्यासाठी आपल्या मुलांचे गुणपत्रिका दि. २४ मे २०२५ पर्यंत अरुण कुंडलकरसर मोबा. नं. ९४२२७२०८९७, पंढीनाथ क्षीरसागर सर मोबां. नंबर ८२०८४९५८६७, पांडुरंग उनवणेसर मो. नं. ७५८८०५६१९, राजु पांचाळ मो नं. ९७६५७६१४३६ यांच्याशी संपर्ककरून गुणपत्रिकेसह नाव नोंदणी करावी असे आवाहन बीड जिल्हा सुतार समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष बापूराव भालेकर यांनी केले आहे.

# अवकाळी पावसाने झालेल्या शेत पिकाच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा-जाधव

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेत पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिले.

मंत्री श्री. जाधव-पाटील म्हणाले, नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांप्रती राज्य शासन संवेदनशील आहे. एप्रिल व मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेत पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी. यासाठी शेत पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करावेत. पंचनामे करण्यासाठी महसूल व कृषी विभागाने पथके गठीत करून ही कार्यवाही गतीने पूर्ण करावी.

मंत्री श्री. जाधव - पाटील म्हणाले, अतिवृष्टी, पूर, अवेळी पाऊस, दुष्काळ, वादळी वारा व गारपीट या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यास शासन नेहमीच प्राधान्य देत आहे. विविध नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेत पिकांच्या नुकसानीपोटी सन २०२३-२०२४ या वर्षात ५४ लाख ८० हजार पात्र शेतकऱ्यांना ४ हजार ८३३ कोटी (चार हजार आठशे तेहतीस कोटी ) रूपये तर २०२४- २०२५ या आर्थिक वर्षात ६९ लाख ३ हजार शेतकऱ्यांना ६ हजार ९८९ कोटी ( सहा हजार नऊशे एकोणनव्वद) आणि १ एप्रिल २०२५ ते आतापर्यंत ९ लाख ७ हजार शेतकऱ्यांना ९७५ कोटी रुपयांची मदत देण्यात आली असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

# लूटमार करणारी टोळी जेरबंद

पाटोदा । प्रतिनिधी

बीड येथील स्थानिक गुन्हे शाखेने पाटोदा मध्ये रस्त्यावर अडवून लुटणारे. टोळी जेर बंद केले अशी माहिती आहे. हे तीन आरोपी पाटोदा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून यावेळी एक दुचाकी देखील पोलिसांनी जप्त केली आहे स्थानिक गुन्हे शाखेतील पीआय श्रीराम खटावकर अशोक दुबाले सोमनाथ गायकवाड बाळू सानप अर्जुन यादव यांनी रस्त्यावर आढळून लोकमान करणाऱ्या टोळीचा मोजके आव्हाळे आहेत. अंगद खंडू काळुसे वय २८ महासांगवी. प्रशांत धनराज भंडारे व २१ राहणार पाटोदा. अजय सदानंद दसे वय २१ राहणार पाटोदा असे पकडलेल्या आरोपीचे नावे आहेत स्थानिक गुन्हे शाखाला आरोपीची लुटमारी बाबत माहिती मिळाल्यानंतर राहत्या घरातून आरोपींना ताब्यात घेण्यात आल्याचे माहिती आहे पाटोदा पोलिसांच्या ताब्यात आरोपी देण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे



# कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने २५ व २६ मे रोजी उंदरी येथे खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील यांच्या दहाव्या पुण्यस्मरणानिमित्त त्यांच्या नांवे असलेल्या स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने रविवार, दिनांक २५ व सोमवार, दिनांक २६ मे २०२५ रोजी केज तालुक्यातील उंदरी येथे विविध उपक्रम तसेच मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोबतच खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम ही होणार आहे. या सर्व कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रीमती प्रभावती बालासाहेब ठोंबरे-पाटील आणि जनार्धनराव दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या वतीने करण्यात आले आहे.




येथील कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, विद्यार्थीप्रिय दिवंगत सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या दहाव्या पुण्यस्मरणानिमित्त रविवार, दिनांक २५ मे रोजी सायंकाळी ७ वाजून १५ मिनिटाला उंदरी (ता.केज) येथे खरीप पिक परिसंवाद व आत्मभान जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते ॲड.राजेसाहेब देशमुख (माजी अध्यक्ष, अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना, अंबाजोगाई.) आणि उद्घाटक म्हणून अविनाश पाठक (भाप्रसे) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मत्स्य व्यवसाय विकास महामंडळ, मुंबई हे असणार आहेत. यावेळी मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे (ख्यातनाम गांधीवादी विचारवंत तथा इतिहास अभ्यासक, लातूर.), आणि प्रा.अरूण गुट्टे (विस्तार कृषि विद्यावेत्ता, अंबाजोगाई.) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच २६ मे सोमवार रोजी सकाळी ठिक ९.४० ते १०.०५ या वेळेत वृक्ष पुजन व संवर्धन करण्यात येवून सकाळी १० वाजता नियोजित कार्यक्रमास सुरूवात होईल. उंदरी (ता.केज) येथील कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती भवन येथे दहाव्या पुण्यस्मरणानिमित्त पुरस्कार वितरण व शेतकरी मेळावा देखिल आयोजित करण्यात आला आहे. या शेतकरी मेळाव्याचे उद्घाटन रमेशराव आडसकर (चेअरमन, अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना.लि.अंबाजोगाई) यांच्या हस्ते होईल. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सौ.नमिताताई अक्षय मुंदडा (केज विधानसभा मतदारसंघ,जि.बीड) या असणार आहेत. तर यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.नागोराव पवार (माजी संचालक विस्तार शिक्षण, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी) आणि प्रकाश देशमुख (विभागीय कृषी सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर) या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी विविध क्षेत्रात कार्यरत असणार्या ११ मान्यवरांना ''कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती पुरस्कार'' तर अन्य ४ जणांना अनुक्रमे स्व.माणिकराव दादासाहेब ठोंबरे-पाटील व स्व.सौ.राणीलक्ष्मीबाई दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. पुरस्कार प्राप्त मान्यवरांत अनिकेत द्वारकादास लोहिया, अबाजोगाई (सामाजिक सेवा पुरस्कार-२०२४), दत्ताभाऊ शंकरराव बारगजे, बीड (सामाजिक सेवा पुरस्कार-२०२५), सय्यद रहेमान चाँद पाशा, लातूर (भक्त पुंडलिक पुरस्कार-२०२४), डॉ.संजय शिवराम पवार, ता.कंधार जि.नांदेड (भक्त पुंडलिक पुरस्कार-२०२५), विनोद नरहरराव रापतवार, नागपूर (आदर्श बंधू भरत पुरस्कार-२०२४), महावीर साहेबराव मस्के पाटील, ता.वडवणी जि.बीड (आदर्श बंधू भरत पुरस्कार-२०२५), डॉ.विनोद विजयकुमार चव्हाण, ता.जि.लातूर (पत्रकारिता पुरस्कार-२०२४), प्रा.नानासाहेब निवृत्तीराव गाठाळ (पत्रकारिता पुरस्कार-२०२५), अजीज खुद्दूस सय्यद, ता.जि.लातूर (सद्भावना पुरस्कार-२०२४), सौ.प्रतिभाताई जयंतराव वानखडे, ता.जि.अमरावती (सद्भावना पुरस्कार-२०२५), डॉ.रामधन अंबादास ठोंबरे (उंदरी ग्रामभूषण पुरस्कार-२०२५) तसेच स्व.माणिकराव दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पांडुरंग साहेबराव आवाड, ता.कळंब,जि.धाराशिव (कुशल कारभारी किसान पुरस्कार-२०२४) आणि रेवणसिध्द भागवत लामतुरे, ता.जि.धाराशिव (कुशल कारभारी किसान पुरस्कार-२०२५) स्व.सौ.राणीलक्ष्मीबाई दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सौ.शोभा शिवाजी खोगरे, अंबाजोगाई (कुशल कारभारीन किसान पुरस्कार-२०२४) आणि सौ.द्वारका प्रतापराव काळे, ता.पुर्णा,जि.परभणी (कुशल कारभारीन किसान पुरस्कार-२०२५) यांचा समावेश आहे. २५ व २६ मे या दोन्ही दिवशी कर्मयोगी डॉ.बालासाहेब ठोंबरे पाटील स्मृती प्रतिष्ठाणच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांसाठी केज, अंबाजोगाई तालुका आणि लातूर तसेच बीड जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन श्रीमती प्रभावती बालासाहेब ठोंबरे-पाटील आणि जनार्धनराव दादासाहेब ठोंबरे-पाटील यांच्या वतीने करण्यात येत आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उंदरी (ता.केज) येथील समस्त गांवकरी उंदरी, माजी कृषी विद्यार्थी संघ व मित्र परिवार, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी आदिंनी पुढाकार घेतला आहे.

पान ६ वरून...

### भोगवटाधारकांना मालकी

खात्याच्या धोरणामुळे आजपर्यंत यात यश मिळू शकले नाही. मात्र याच परिपत्रकाच्या आधारे गेवराई नगर परिषदेने भोगवटा धारकांना मालकीच्या पीटीआर दिल्या आहेत.

त्याच पध्दतीने अंबाजोगाई नगर परिषदेने देखील येथील हजारो भोगवटा धारकांना त्यांच्या मालकीच्या जागेत घेऊन त्यांना त्यांच्या मालकीच्या पी टी आर द्याव्यात जेणे करून त्यांना शासनाच्या पंतप्रधान आवास योजना, रमाई आवास घरकुल योजना व अन्य शासकीय योजनांचा लाभ घेता येईल अशी मागणी अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. या निवेदनावर राजकिशोर मोदी, आदमाने महादेव , खालेद चाउस, गणेश मसणे, सुनील वाघाळकर, खयामोद्दीन काझी, किशोर परदेशी,कमलाकर हेडे, धम्मा सरवदे, दत्ता सरवदे, आकाश कऱ्हाड, गोविंद पोतंगले, रफीक गवळी, असलम शेख, शरद काळे,अकबर पठाण, मुन्ना वेडे, दत्ता हिरवे,संतोष चिमणे,अक्षय परदेशी आशिष ढेले, तौसिफ सिद्दीकी, यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### बीड पथकाने रोखले

हमीपत्र घेवून सदरचे दोन्ही बालविवाह रोखण्यात आले, ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली -क्ढण पथक प्रमुख -झख वर्षा व्हगाडे, पोलीस अंमलदार अशोक शिंदे, प्रदीप येवले, मनीषा खरमाटे, रूपाली टोणे,यांचेसह बालविवाह अधिकारी ग्रामसेवक एस. बी. सपकाळ, व सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे यांनी केली.

### पाटोदा एसटी आगारातील

बसेस खरेदी करण्यासाठी महामंडळाने पुढाकार घेतला आहे पाटोदा घराणे पर्यावरण पूरक बसेस देण्याची मागणी केली आहे परंतु परिवहन महामंडळाच्या वेळ काढून धोरणामुळे इलेक्ट्रॉनिक बसेस उपलब्ध होण्यास विलंब होत आहे याचा आर्थिक फटका राब मला बसत आहे पाटोदा आजारात चार्जिंग स्टेशन उभारले परंतु ही बस उपलब्ध होत नसल्याने चार्जिंग स्टेशन दुळ खात पडून आहे.

### अंबाजोगाईच्या लेकीनंतर

आहे. अंबाजोगाईच्या इतिहासातील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत एवढे घवघवीत यश संपादित करणारे हे पहिले दाम्पत्य असुन यापूर्वी अशा अद्वितीय यशाचे मानकरी कुणीही ठरले नसल्याची चर्चा अंबानगरीत सर्वत्र ऐकावयास मिळते आहे.

पत्नी अनुष्काचे योगदान ठरले अनमोल - आनंद

मी जरी आज केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या आय.एफ.एस प्रकारात संपूर्ण देशातून क्रमांक दोन (२) च्या रँक ने उत्तीर्ण होत यश प्राप्त केलेल असले तरी यात आई-वडील, सासू-सासरे यांच्या आशीर्वादासह माझी पत्नी अनुष्का जी की, माझ्या अगोदर वर्षभराने याच परीक्षेत संपूर्ण देशात क्रमांक चार (४) रँकने तर महाराष्ट्र राज्यात पहिल्या रँकने आय.एफ.एस. प्रकारात उत्तीर्ण झाली होती. तिने तिचा कार्यालयीन कार्यभार व कुटुंब सांभाळून मला केलेले सहकार्य मी शब्दात सांगू शकत नाही. म्हणून याप्रसंगी मी एवढेच म्हणेल की, माझ्या या प्रवासात पत्नी अनुष्काचे योगदान अगदी मोलाचे असून ते माझ्यासाठी अनमोल ठरले आहे.

लोहिया-खंडेलवाल दाम्पत्याचे आणि संपुर्ण परिवाराचे आनंद यांच्या या यशाने यानिमित्ताने पुन्हा एकदा सर्वत्र भरभरून कौतुक होत असून आनंद-अनुष्का यांच्यावरती वरुणराजासह सर्वच स्तरातून आणि विशेषतः मित्र-मैत्रिणी, स्नेही, नातेवाईक आणि सभोवतालच्या परिसरातील परिचीतांकडून अभिनंदनाचा वर्षाव होतो आहे.....!

### राज्य स्तरावर शेकडो

काम करण्याची संधी देवु असे अभिनेते सुधीर निकम म्हणाले.

बीड जिल्ह्यात गेवराई ने ११४ वर्षाची नाटकाची परंपरा कायम ठेवली आहे आणि राज्य स्तरावर नाटकात सहभाग नोंदवुन आर्ट फन अकॅडमी च्या बालकलाकारांनी शैकडो पारितोषिक मिळवले आहे. आर्ट ऑफ फन अकॅडमिचे संचालक दिपक गिरी,शिवकुमार,रोहित पुराणिक,विवेक शर्मा यांनी बाल कलाकारांना स्टेज निर्माण करुन देण्यासाठी पुढाकार घेऊन अधिक मेहनत घेतली आहे असे बालरंभुमि राज्य उपाध्यक्ष दिपाताई क्षिरसागर म्हणाले. आर्ट ऑफ फन डान्स ॲण्ड ॲक्टींग शिबीरात सहभागी बालकलाकारांना साप्ताहिक गेवराई आदर्श यांच्या सौजन्याने प्रमाणपत्र देवुन गौरविण्यात आले. यावेळी गेवराई येथील जेष्ठ कलावंत प्रशांत रुईकर , मुकुंद टाक,सिने नाट्य कलावंत संतोषकजबे, उमेश मानधने व परीवार, पत्रकार लक्ष्मण ऊमाप, रोकडेश्वर प्रासादिक नाट्य मंडळाचे सदस्य,शिबिरात सहभागी सर्व विद्यार्थी, पालक व आदी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाचोड परिसरात पूर्वमोसमी वादळी पावसाचा तडाखा

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पाचोड परिसरात अचानक वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस सुरु झाला. यामध्ये फळबागासह कच्ची घरे, विजेचे खांब, विविध झाडे, शेडनेट उध्वस्त झाल्याची घटना घडली. पाचोड परिसरातील वडजी, थेरगाव, लिंबगाव, हर्षी शिवारात अचानक दुपारी चार वाजेच्या सुमारास चक्री वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरवात झाली. शेतात असलेल्या बहुतांश मोसंबीच्या झाडांच्या फांद्या तुटल्या तर पपई, आंबा, डाळिंब, या फळबागासह लिंब, बाभूळीचे झाडे तुटून तर काही उन्मळून घरावर, रस्त्यावर पडली. वादळी वाऱ्यामुळे कच्ची पत्र्याची घरे भुईसपाट झाली.**



शेकडो घरांवरील पत्रे उडून गेली. घरात बसलेल्यांना काही कळण्यापूर्वीच हे निसर्ग संकट ओढवले गेले. शेतातील अनेक विजेचे खांब आणि तारा तुटल्या. बहुतांश ठिकाणी आडवे पडलेल्या झाडांमुळे रस्त्यावरील वाहतूक खोळंबली. परंतु जेसीबी आणून रस्त्यावरील झाडे, विजेचे खांब बाजूला केल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली. विजेचे खांब पडल्याने काही काळ परिसरातील गावाचा विद्युत पुरवठा खंडित झाला. शेतावर गेलेले शेतकरी, शेतमजूर वादळ, मुसळधार पाऊस पाहून भांबावले. सर्वत्र अर्धा तास जोरदार झालेल्या पावसामुळे जमिनीतील उष्णता निघून गारवा पसरला. शेतावर गेलेल्यांनी बचावासाठी निंब, बाभूळ आदी विविध झाडांचा आश्रय घेतला, शेकडो झाडे अर्ध्यातून तुटली. तर काही उन्मळून पडली. मात्र नशीब बलवत्तर म्हणून जीवितहानी झाली नाही. शेतातील कुटुंब सर्वत्र सैरभैर झाले. मोसंबीच्या बागासह डाळिंब, पपईच्या बागा, उन्हाळी बाजरीचे पीक उध्वस्त झाले. तोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळत आहे. वडजी येथील कृष्णा भांड व अशोक भांड यांच्या डाळिंबाच्या बागा भुईसपाट झाल्या, तर शाळेवरील पत्रे उडून गेल्याने शाळा उघड्यावर पडली. थेरगाव येथील सोमा निर्मळ व शरद निर्मळ यांच्या शेतातील शेडनेट, त्यातील टोमॅटो व केळीचे पीक भुईसपाट झाले. तर बाळू रामराव बांगर याच्या घरावरील पत्रे उडून गेली. घरावर निंबाचे झाड कोसळल्याने पूर्णतः कोसळले.

## घरच्या घरी तपासा बियाणाची उगवणक्षमता



खरीप हंगाम जवळ आला की शेतकऱ्यांची पेरणीची लगबग सुरू होते. उत्पादनात भरघोस वाढ व्हावी, यासाठी बियाण्याची निवड हा पहिला आणि महत्त्वाचा टप्पा ठरतो. अनेकदा शेतकरी बांधव दरवर्षी बाजारातून नवे बियाणे खरेदी करतात. परंतु, हे बियाणे महाग असतानाही त्याची उगवणक्षमता कितपत योग्य आहे, हे निश्चित नसते. अशा वेळी वेळ, श्रम आणि पैसा वाया जाण्याचा धोका असतो. त्यामुळेच 'उगवणक्षम बियाणं' वापरणे हा खरीप यशस्वी करण्याचा मूलमंत्र ठरतो.

**उगवणक्षमता तपासणीच्या तीन सोप्या पद्धती** : गोणपाट वापरून तपासणी - प्रत्येक पोत्यातून थोडे बियाणे घेऊन एकत्र करा. १०० दाण्यांचे ३ नमुने तयार करा. ओल्या गोणपाटावर दाणे १०-१० च्या रांगेत लावा.वरून दुसरा ओला गोणपाट घाला आणि गुंडाळी करून सावलीत ठेवा. ६ ते ७ दिवसांनी उगवलेले दाणे मोजा. ७० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक उगवणक्षमता असल्यास बियाणे योग्य आहे, असे समजावे.

**रद्दी पेपर वापरून तपासणी** – रद्दी पेपरला चार घड्या घालून ओले करा. प्रत्येकी १० बियांच्या १० ओळी तयार करा (एकूण १०० बिया). गुंडाळ्या करून पिशवीत ठेवा.काही दिवसांनी अंकुर आलेल्या बिया मोजा. ७० टक्के किंवा अधिक बिया उगवल्यास बियाणे योग्य समजावे.

**पाण्यात भिजवून त्वरीत तपासणी** – १०० दाण्यांचे ३ संच तयार करा. ५ ते ७ मिनिटे पाण्यात ठेवा. टरफल सुरकुतलेले/फुगलेले दाणे वगळा. फुगलेले दाणे खराब. टरफल शाबूत व सुरकुत्या नसलेले दाणे चांगले. ७० टक्के किंवा अधिक दाणे चांगले असल्यास बियाणे वापरण्यास योग्य.

## खरीपात सोयाबीन लागवड नियोजन

**राज्यात मान्सूनचे आगमन काही दिवसांत होत असून अनेक जिल्ह्यांत मान्सून पुर्व पाऊस झाला आहे. येत्या १५ जुलै पर्यंत बऱ्यापैकी पेरणी झालेली असेल असे सांगण्यात येत आहे. खरिपात सोयाबीन लागवडीचे नियोजन कसे करावे याबाबत माहिती करून घेतल्यास चांगला फायदा होईल.**



**लागवडीचे अंतर :**

सोयाबीन लागवड करताना सुरुवातील दोन ओळींमधील अंतर निवडणे महत्त्वाचे आहे. पूर्वी आम्ही १४ इंचावर सोयाबीनची पेरणी करायचो. मात्र, अंतर दाट झाल्यामुळे उतार कमी यायचा. त्यानंतर १८ इंचावर सोयाबीन लागवड करण्याचा प्रयोग केला. त्यामध्ये उतार चांगला मिळाला, एकरी २१ क्विंटल उत्पादन मिळाले.

**जातींची योग्य निवड :**

सोयाबीनच्या विविध जाती कृषी विद्यापीठांनी विकसित केल्या आहेत. त्या जातींचा वापर शेतकर्यांनी पेरणीसाठी केला पाहिजे. सोयाबीनच्या दोन जातींची निवड केली पाहिजे. त्यामध्ये लवकर येणारी व उशिरा येणारी अशा जाती निवडल्या पाहिजेत. जेणेकरून जास्त पाऊस झाला तर दोन्हीपैकी एक पीक हाती येऊ शकते. परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने सोयाबीनची '६१२' ही चांगली जात विकसित केली आहे. या जातीचे वैशिष्ट्य म्हणजे पिकाला खोडकिडा लागत नाही; जास्त पावसातही उभा राहणारी, खाली न लोळणारी जात आहे. तसेच याच कृषी विद्यापीठाने विकसित केलेली '७१' ही जातही चांगली आहे. अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने 'आंबा' ही लवकर येणारी सोयाबीनची जात विकसित केली आहे. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा 'दुर्वा' सोयाबीनचा लवकर येणारा वाण आहे. तसेच मध्यप्रदेशातील '२००१' ही चांगली जात आहे. सोयाबीनचा '९१०५' हा सुध्दा चांगला वाण आहे. ज्या शेतकर्यांची जमीन काळी आहे आणि उत्पादन चांगले घ्यायचे असेल तर त्या शेतकर्यांनी 'फुले किमया' या जातीचा वापर करावा. ही जात जास्त उत्पादन देते.

**तणनियंत्रण, कीड रोग नियंत्रण :**

सोयबीन पिकामध्ये तणनाशकाची फवारणी करताना जमिनीच्या पृष्ठभागावर सगळीकडे तणनाशक पडेल याची काळजी घ्यावी. सोयाबीन पिकावर 'यलो मोझॅक' हा रोग प्रामुख्याने आढळतो. हा रोग पांढऱ्या माशीच्या प्रादुर्भावामुळे होतो. बरेचसे शेतकरी हे कीटकनाशक व बुरशीनाशक या दोनच औषधांची फवारणी करतात. मात्र, शेतकर्यांनी पांढरी माशी, अळी आणि बुरशी नियंत्रणासाठी तीन औषधांची फवारणी करणे गरजेचे आहे.

# खरीपातील पिकांचे आणि फळझाडांचे नियोजन; जाणून घ्या कृषी तज्ज्ञांची शिफारस!

**सध्या खरीप पिकांची पेरणी करण्याची तयारी करण्याचे दिवस आहेत. वेगवेगळ्या खरीप व फळ पिकात आंतर मशागतीची कामे, कीड आणि रोग नियंत्रण फवारणी, सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर व इतर कामे सुरु आहेत. कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांनी पिकांच्या वेगवेगळ्या अवस्थेत काय काळजी घ्यावी याबद्दल शिफारस केलेली आहे.**



**कापूस** : कापूस पिकात रसशोषण करणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंवा ॲसिटामॅप्रिड २० % २ ग्रॅम प्रति १० लिटर किंवा फलोनिकॅमिड ५०% ६० ग्रॅम प्रति एकर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. कापूस पिकाची लागवड करून एक महिना झाला असल्यास कोरडवाहू कापसाला ३१ किलो नत्र प्रति हेक्टरी तर बागायती कापसाला ५२ किलो नत्र प्रति हेक्टरी वरखताची मात्रा द्यावी. कापूस पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. कापूस पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे.

**तूर** : सूक्ष्म अन्नद्रव्याच्या कमतरतेमुळे तूर पिक पिवळे दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ईडीटीए चिलेटेड मिक्स मायक्रोन्यूट्रिएंट ग्रेड-२ ५० ग्रॅम किंवा ५० मिली + १९:१९:१९ खत १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. तूर पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. तूर पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.

**मूग/उडीद** : मूग/उडीद पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. मूग/उडीद पिकात मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची पावसाची उघड बघून फवारणी करावी. उडीद पिकात करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी मॅन्कोझेब २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी. खोड माशीच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ ईसी किंवा मोनोक्रोटोफॉस ३६ एसएल १ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी.

**भुईमूग** : भुईमुग पिकात जमिनीत वापसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.

**मका** : मका पिकात जमिनीत वाफसा असताना आंतरमशागतीची कामे करून पीक तण विरहीत ठेवावे. लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वरील कीटकनाशकांची आलटून पालटून पावसाची उघड बघून फवारणी करावी. फवारणी करत असताना किटकनाशक पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी. मका पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा.

**केळी** : केळी बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. केळी बागेतील रोगग्रस्त पाने काढून टाकावीत. केळी बागेस ५० ग्रॅम यूरिया प्रति झाड खतमात्रा द्यावी. केळी बागेत मर व बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझीम + कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी.

**आंबा** : आंबा बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. रस शोषण करणाऱ्या किडींच्या व्यवस्थापनासाठी इमिडाक्लोप्रिड ४ ते ५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी.

**द्राक्ष** : द्राक्ष बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. रोगग्रस्त पानाची विरळणी करून घ्यावी. द्राक्ष बागेत मर व बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझीम + कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी.

**सिताफळ** : सिताफळ बागेत पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी व साचलेल्या अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा. सिताफळ बागेत मर व बुरशीजन्य रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझीम + कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघड बघून फवारणी करावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५६८ : नेदरलँड्सला स्पेनपासून स्वातंत्र्य.
१७३७ : पोर्तुगीजांकडुन जिंकल्यानंतर पेशव्यांनी अर्नाळा किल्ला परत बांधून घेतला.
१८०५ : नेपोलियन बोनापार्टला इटलीचा राज्यपदी राज्याभिषेक.
१८२९ : सिरील डेमियनला ॲकॉर्डियन या वाद्याचे पेटंट मिळाले.
१९११ : न्यू यॉर्क सार्वजनिक ग्रंथालय सामान्य जनतेस खुले.
१९४९ : पश्चिम जर्मनी हे राष्ट्र अस्तित्त्वात आले.
१९५१ : तिबेट देशाने चीनबरोबर तिबेटच्या शांततेत मुक्तीसाठी सतरा बिंदू करार केला.
१९५६ : आयुर्विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करण्यासंबंधीचे विधेयक मंजूर झाले.
१९५८ : अमेरिकेचा पहिला उपग्रह एक्सप्लोरर १ बंद पडला.
१९८४ : बचेंद्री पाल या महिलेने एव्हरेस्ट शिखर चढून जाणारी पहिली भारतीय महिला होण्याचा मान मिळविला.
१९९५ : जावा संगणक भाषेची अधिकृत घोषणा.
१९९७ : माऊंट एव्हरेस्ट हे सर्वोच्च शिखर सर्वप्रथम सर करणार्या तेनसिंग नोर्गे यांचे नातू ताशी तेनसिंग यांनी माऊंट एव्हरेस्ट सर केले.
२००८ : भारतीय लष्कर दलाच्या सैन्यांनी जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या पुर्थ्वी-२ या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली.
२०१६ : भारतीय अंतरीक्ष संशोधन संस्था इस्रो ने आंध्रप्रदेश मधील श्रीहरिकोटा अंतराळ केंद्रातून संपूर्ण भारतीय बनावटीचे अंतराळ शटल आरएलव्ही-टीडी ची स्थापना केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०५२ : फ्रान्सचा राजा फिलिप (पहिला) यांचा जन्म. (मृत्यू: २९ जुलै ११०८)
१७०७ : स्वीडीश वनस्पतीतज्ज्ञ कार्ल लिनिअस यांचा जन्म. (मृत्यू: १० जानेवारी १७७८)
१८७५ : अमेरिकन उद्योगपती आल्फ्रेड पी. स्लोन यांचा जन्म. (मृत्यू: १७ फेब्रुवारी १९६६)
१८९६ : जुन्या जमान्यातील रंगभूमीवरील श्रेष्ठ संगीत समीक्षक केशवराव भोळे यांचा जन्म.
१९१८ : इंग्लिश क्रिकेटपटू डेनिस कॉम्पटन यांचा जन्म. (मृत्यू: २३ एप्रिल १९९७)
१९१९ : जयपूरच्या राजमाता महाराणी गायत्रीदेवी यांचा जन्म. (मृत्यू: २९ जुलै २००९)
१९२२ : प्रख्यात भारतीय उपखंडातील इतिहासकार रणजीत गुहा यांचा जन्मदिन.
१९२६ : मार्क्सवादी कम्युनिस्ट नेते पी. गोविंद पिल्लई यांचा जन्म. (मृत्यू: २२ नोव्हेंबर २०१२)
१९२६ : भारतीय बिशप बॅसिल साळदादोर डिसोझा यांचा जन्म. (मृत्यू: ५ सप्टेंबर १९९६)
१९३३ : मुद्रितशोधन तज्ञ मोहन वेल्हाळ यांचा जन्म.
१९४३ : पटकथालेखक आणि दिग्दर्शक कोवेलमूडी राघवेंद्र राव यांचा जन्म.
१९४५ : भारतीय दिग्दर्शक, पटकथालेखक आणि लेखक पद्मराजन यांचा जन्म.(मृत्यू: २४ जानेवारी १९९१)
१९४८ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित माजी सेवानिवृत्त भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी आणि भारताचे माजी नियंत्रक आणि महालेखा परीक्षक विनोद राय यांचा जन्मदिन.
१९५१ : रशियन बुद्धीबळपटू अनातोली कार्पोव्ह यांचा जन्म.
१९६५ : वूर्केरी रामन, भारतीय क्रिकेट खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५७ : ऑगस्टिन लुई कॉशि, फ्रेंच गणितज्ञ. (जन्म: २१ ऑगस्ट १७८९)
१९०६ : नॉर्वेजियन नाटककार, दिग्दर्शक आणि कवी हेन्रिक इब्सेन यांचे निधन. (जन्म: २० मार्च १८२८)
१९३० : प्रख्यात भारतीय पुरातत्व व संग्रहालय तज्ञ तसचं, बनारस हिंदू विद्यापीठातील प्राचीन भारतीय इतिहास आणि संस्कृतीचे प्राध्यापक राखालदास बंडोपाध्याय उर्फ जे. आर. डी. बनर्जी यांचे निधन.
१९३७ : रॉकफेलर घराण्यातील पहिले उद्योगपती, स्टँडर्ड ऑईल उद्योगसमूह व अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतील पहिल्या तेल उद्योगाचे संस्थापक जॉन डेव्हिसन रॉकफेलर यांचे निधन. (जन्म: ८ जुलै १८३९)
१९६० : निऑन लाईट चे निर्माते जॉर्ज क्लोडे यांचे निधन. (जन्म: २४ सप्टेंबर १८७०)
१९७५ : भारतीय सैन्यातील ले. जनरल व व्हिक्टोरिया क्रॉस मिळविणाअरे पहिले ले. जनरल पी. एस. बापट यांचे निधन.
१९३४ : क्लाईड बॅरो, अमेरिकन दरोडेखोर.
२०१० : भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या संस्थापक सदस्यांपैकी एक व भारतीय नक्षलवादी आंदोलनाचे जनक कानू सन्याल यांचे निधन.
२०१० : राष्ट्रीय पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय तेलगु भाषिक चित्रपट गायिका वेतुरी सुंदरम्मा मूर्ती यांचे निधन.
२०१४ : भारतीय क्रिकेटर माधव मंत्री यांचे निधन. (जन्म: १ सप्टेंबर १९२१)
२०१४ : भारतीय संगीतकार आणि दिग्दर्शक आनंद मोडक यांचे निधन. (जन्म: १३ मे १९५१)

## थोडक्यात



### दहशतवादाविरुद्ध लढणे प्रत्येकाचे कर्तव्य -प्राचार्य हांगे

**पाटोदा । प्रतिनिधी**

देशातच नव्हे तर संपूर्ण जगात दहशतवाद व हिंसाचार बोकाळत चालला असून त्यामुळे माणुसकी, सहिष्णुता, सामंजस्य व एकोपा धोक्यात येत आहे. भारताच्या अहिंसा व सहिष्णुतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून सकल मानव समाजात शांतता व ऐक्य अबाधित ठेवण्यासाठी दहशतवादी व हिंसाचारी शक्तींविरुद्ध लढणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २१ मे रोजी स्व. पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथीदिनी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त आयोजित प्रतिज्ञागृहण कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. मनोजकुमार प्रकाश, कार्यालय अधीक्षक अशोक पवार उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात प्राचार्य हांगे पुढे म्हणाले की, आपल्या डोळ्यांसमोर दुर्घटना अथवा हिंसाचार घडत असताना बघ्यांची भूमिका न घेता प्रत्येकाने तो हिंसाचार थांबवला पाहिजे. सामाजिक सलोखा हा समाजोन्नतीसाठी आवश्यक असून तो टिकवून ठेवणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. अभिवादन व प्रतिज्ञागृहण कार्यक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक, पालक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### जिल्हा हद्दीत ३ जूनपर्यंत ड्रोन कॅमेरा, मानवविरहीत यंत्र उडविण्यास मनाई

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय सैन्याकडून पहलगाव येथील दहशतवादी हल्ल्याचे नंतर ऑपरेशन सिंदुर राबवुन पाकिस्तान मधील दहशतवाद्यांची ठिकाणे नष्ट करण्यात आलेली आहेत. यामुळे स्लीपर सेल सक्रिय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ड्रोन कॅमेरा, मानवविरहित यंत्र चालविण्यास, उडविण्यास मनाई करणेबाबत दिनांक १४ मे ते ३ जून २०२५ पर्यंत भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ लागू करणे बाबत राज्य गुप्तवार्ता विभाग मुंबई यांनी कळविले आहे.

सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेता नागरिकांचे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून संपूर्ण बीड जिल्ह्यात दिनांक १४ मे २०२५ पासून ते ३ जून २०२५ पर्यंत तातडीचे परिस्थितीत, नमूद कालावधी करिता भारतीय नागरी सुरक्षा संहिता कलम १६३ (१)(३) अन्वये आदेश लागू करणेस विनंती करण्यात आली आहे.

तरी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) मधील शक्तीचा वापर करून नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बीड जिल्हा हद्दीत दि. १६ मे २०२५ ते ३ जून २०२५ या कालावधीत ड्रोन कॅमेरा, मानवरहीत यंत्र चालविण्यास किंवा उडविण्यास मनाई आदेश एकतर्फी पारीत करण्यात येत आहे, असे बीडचे अपर जिल्हादंडाधिकारी यांनी नमुद केले आहे.

### परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी नविन नोंदणी मालिका सुरू करण्यात येणार

**बीड । प्रतिनिधी**

**परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी नोंदणी मालिका २३ ही सद्यस्थितीत सुरु असून सदर मालिकेतील नोंदणी क्रमांकाचे वाटप संपत आलेले आहेत. त्या अनुषंगाने परिवहनेत्तर दुचाकी वाहनांसाठी २३ ०००१ ते ९९९९ ही मालिका दि. ०३ जून२०२५ पासून सुरु करण्यात येईल.**

ज्या वाहन धारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक घ्यावयाचा असेल त्यांनी आपला विहीत नमुन्यातील अर्ज, सदरील आकर्षक क्रमांकाला लागू असलेली फी च्या रकमेचा, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बीड यांच्या नावाचा धनादेश वा धनाकर्ष (   ) व आपल्या ओळखपत्राच्या व आधार कार्डच्या साक्षांकीत प्रतीसह दि. २६ मे ते ०२ जून २०२५ रोजी दुपारी २.०० पर्यंत कॅश काऊंटर खिडकी क्र. ०२ वर जमा करावा. सदर मालिकेतील आकर्षक क्रमांकाचे वाटप महाराष्ट्र मोटार वाहन नियम व परिवहन आयुक्तांच्या परिपत्रकानुसार करण्यात येईल. तसेच एकाच आकर्षक क्रमांकासाठी एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झालेल्या अर्जाची नोटीस दि. ०२ जून २०२५ रोजी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दुपारी ०४.०० वाजता प्रसिध्द करण्यात येईल. दि. ०३ जून २०२५ रोजी एकापेक्षा जास्त अर्ज असलेल्या अर्जदारांनी दुपारी २.०० वाजेपर्यंत बंद लिफाफ्यामध्ये मुळ शुल्का व्यतिरिक्त अधिक रकमेचा धनादेश जमा केल्यानंतर त्याच दिवशी दुपारी ०३.०० वाजता लिलावाची विहित कार्यपध्दती अवलंबून नोंदणी क्रमांकाचे वाटप करण्यात येईल. तरी सर्व वाहन धारकांनी, नागरिकांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

# गाव-पातळीवर विविध उपक्रमांची अमलबजावणी करण्यात येणार

## जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवणे यांची माहिती

बीड । प्रतिनिधी

केंद्र व राज्य शासनाच्या वतीने पर्यावरण व स्वच्छतेच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत जिल्ह्यात गावपातळीवर विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक आदित्य जीवने यांनी दिली आहे.






जिल्ह्यात सर्व ग्रामपंचायत मध्ये दिनांक २२ मे ते ५ जून २०२५ या कालावधीत प्लास्टिक प्रदूषण निर्मूलन मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत गावातील सार्वजनिक ठिकाणी श्रमदानातून स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे. तसेच प्लास्टिक संकलन, एकल वापराच्या प्लास्टिकचा वापरावर बंदी करणे तसेच कचऱ्याचे वर्गीकरण करून वर्गीकरण केंद्रात साठवणे याविषयी जनजागृती केली जाणार आहे. टाकाऊपासून टिकाऊ या संकल्पनेनुसार प्लास्टिक कचऱ्यापासून उपयोगी वस्तू तयार करण्याचे उपक्रमही राबवले जातील. गावात सोशल मीडियाच्या माध्यमातून पर्यावरण व स्वच्छतेबाबत जनजागृती केली जाणार आहे. या मोहिमेचा प्रारंभ श्रमदान आयोजित करून करावा असे आवाहन मुख्य मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे. यामध्ये श्रमदानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, तसेच कचरा वर्गीकरण करावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

दिनांक २८ मे रोजी मासिक पाळी व्यवस्थापन दिन साजरा करण्यात येणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शाळा व अंगणवाड्यांमार्फत किशोरवयीन मुली व महिलांना मासिक पाळी व्यवस्थापन, स्वच्छता व सॅनिटरी नॅपकिन्सच्या वापराबाबत माहिती देण्यात येईल. यासाठी आरोग्य कर्मचारी, महिला बचत गट, महिला शिक्षिका, आशा वर्कर्स, अंगणवाडी कार्यकर्ती या विषयी जनजागृती करणार आहेत

या सर्व उपक्रमांचे यशस्वी आयोजन गटविकास अधिकारी व संबंधित विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांनी नियोजनपूर्वक करावे. प्रत्येक गावासाठी खतखडा भरण्याबाबत सूचना दिल्या आहेत त्याचे संनियंत्रण कर्मचारी करत आहे. या उपक्रमात सर्व ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग घ्यावा व हे उपक्रम यशस्वी करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे -राजेंद्र मस्के



**विधानसभा निवडणुकीत जे झाले ते मी विसरून गेलो आहे -महेबुब शेख**

बीड । प्रतिनिधी

काही दिवसांवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आल्या असून या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आष्टी येथे तालुका स्तरीय बैठक बोलवण्यात आली होती. जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के व प्रदेश युवक अध्यक्ष महेबूब शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली. बैठकीस जिप सदस्य सतीश शिंदे, प्रदेश सचिव ॲड.नरसिंह जाधव, अण्णासाहेब चौधरी, सुनील नाथ, तालुका अध्यक्ष परमेश्वर शेळके,संजय थोरवे,राम खाडे, मिसाळ पाटील, मिर्झा बेग,तांबेताई यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बहुसंख्येने गर्दी केली होती.

बैठकीस संबोधित करताना राजेंद्र मस्के म्हणाले की,लोकसभा व विधानसभा निवडणुका पार पडल्या, आता जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद निवडणुका म्हणजे कार्यकर्त्यांच्या निवडणुका होणार आहेत.या निवडणुकांमध्ये निष्ठावंत कार्यकर्त्यांना संधी दिली जाणार आहे. आष्टी मतदार संघातील लोक व कार्यकर्ते शरद पवार साहेबांना मानणारा आहे. आष्टी मतदार संघात सत्ता असो अथवा नसो पक्षाशी एकनिष्ठ असणाऱ्या कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे. या कार्यकर्त्यांच्या जीवावर पक्ष उभा राहिला. निष्ठेने काम करून कार्यकर्त्यांनी निवडणुकीत विजय मिळवून दिला. परंतु विजय झाल्यानंतर अथवा सत्तेत गेल्यानंतर कार्यकर्त्यांचा विचार आमदारांनी केला नाही अशी खंत ही काही कार्यकर्त्यांनी या बैठकीदरम्यान व्यक्त केली.

आगामी काळातील निवडणुकांत विजय होण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले. विधानसभा निवडणुकीत जे काही झाले ते सर्व मी विसरून गेलो आहे. सामान्य कुटुंबातील एक कार्यकर्ता म्हणून मी काम करतो. पक्ष मजबुत करून पक्षाला विजय प्राप्त करून देण्यासाठी माझी धडपड आहे. शरद पवार साहेब यांच्या नेतृत्वात आपला पक्ष कायम जनमानसात अग्रेसर आहे. निष्ठावान व मेहनत करणाऱ्या कार्यकर्त्याला न्याय देण्यासाठी ही आजची आढावा बैठक आहे. पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी नेतृत्वाच्या मार्गदर्शना खाली काम करावं. असा सल्ला महेबूब शेख यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना दिला.

## रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे- डॉ. संजय राऊत

### अभिमान अर्बन पतसंस्थेच्या वतीने रक्तदान शिबिर संपन्न

बीड । प्रतिनिधी

रक्तदान हे सर्व दानापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे अभिमान अर्बन पतसंस्थेने रक्तदान शिबिर घेऊन मोलाचे कार्य केले असून याची आम्हालाही मदत होणार आहे .रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी वारंवार अशी रक्तदान शिबिरे झाली पाहिजेत अशी अपेक्षा जिल्हा रुग्णालयाचे शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांनी यावेळी व्यक्त केली

मंगळवारी बीड शहरातील अरुण हॉस्पिटल जवळील आभिमान अर्बन पतसंस्था येथे रक्तदान शिबिर पार पडले.या शिबिराचे प्रमुख ऊद्घाघाटक बीड जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन आदरणीय डॉ. संजय(भाऊ) राऊत, कुंडलिक बाप्पु खांडे, हे होते तर प्रमुख ऊपस्थिती सेवानिवृत्त प्राचार्य सोनवणे सर, डॉ.प्रा. सदाशिव बंड सर, पि.आय. माने सर, डॉ. राजेंद्र बंड , प्रा.कल्याण घोडके सर, प्रा.बनसोडे सर, प्रा.कुडके सर,



प्रा. खांडे सर, प्रा. सोंडगे(खोसे) मॅडम, प्रा.काळे सर, रोहन गायकवाड, सचस्कर , सुधीर काकडे या सर्वांच्या ऊपस्थितीमध्ये ऊद्घाटन संपन्न झाले. या ऊद्घाटन प्रसंगी रक्तदानाला सुरुवात अंकुश घोलप, श्रीनाथ घोडके, सचिन घोडके आणि काकासाहेब रहाडे,यांनी केली त्याबरोबरच बँकेचे सर्व कर्मचारी, व यशराज नाना मित्रमंडळाच्या अनेक मित्रमंडळींनी, मुकेश भैय्या, प्रविण मेम्बर पवार आणि अशा अनेक मित्र मंडळींनी दिवसभर रक्तदान केले, वरील सर्वांचाच बँकेतर्फे ह्रदयपुर्वक सत्कार करण्यात आला.आदरणीय सिव्हिल सर्जन डॉ. राऊत यांनी बँकेचे व संचालक मंडळाचे, कर्मचाऱ्यांचे खुप कौतुक केले. आभिमान अर्बन बँकेने जे समाजकार्य केले ते कुठल्याही शब्दात वर्णन करण्यासारखे नाही. आम्हाला या सहकार्याची खुप गरज होती. ती तुम्ही कांही अंशी भरुन काढली.अशी शाबासकीची थाप संस्थेच्या पाटीवर दिली व अशा उपक्रमांना माझ्या कडुन सर्व सहकार्य करण्याचे अश्वासन दिले. तसेच आभिमान.अर्बन पतसंस्थेवर प्रेम करणाऱ्या सर्वांचेच ह्रदयपुर्वक अभार मानले.

## उपोषणाला बसल्यानंतर दिव्यांगांना प्रमाणपत्र दिले

**जालना । प्रतिनिधी**

**दिव्यांग व्यक्ती जिल्हाधिकारी कार्यालय समोर २१मे रोजी अपंग प्रमाणपत्र मिळण्यासाठी उपोषण करण्यात आले होते परंतु तिची तत्काळ दखल घेऊन जिल्हा शल्यचिकित्सक राजेंद्र पाटील यांनी आज उपोषणाला बसलेल्या दिव्यांग व्यक्तीला प्रमाणपत्र देण्यात आले या संदर्भात श्री पाटील यांना विचारले असता ते म्हणाले की दिव्यांग व्यक्तीचं अपूर्ण ऑनलाईन असल्यामुळे प्रमाणपत्र देण्यात आलेला होते असे त्यांच्याकडून सांगण्यात आले. संपूर्ण चौकशी करून दिव्यांग व्यक्तींना व्यक्तीला आज प्रमाणपत्र देण्यात आले.**

जमीन अब्दुल वासेद शेख हे मागील ०३ वर्षा पासुन त्याचे अपंग प्रमाणपत्र रिन्यु करण्यासाठी आपल्या कार्यालयात चकरा मारुन सुध्दा त्यांचे अपंग प्रमाणपत्र आज पावेतो रिन्यु झालेले नसुन आपल्या कार्यालयाचे कर्मचारी सदरील प्रमाणपत्र बाहेरुन काढुन घेण्यास सांगतात व बाहेर नेट वर आपल्या मार्फत रिनीवल पाठवण्यात न आल्यामुळे सदरील प्रमाणपत्र मागील ०३ वर्षापासुन जमीन अब्दुल वासेद शेख यांचे अपंग प्रमाणपत्र मिळालेले नाही. करिता सदरील प्रकरणाची गंभीर पुर्वक दखल घेवुन सदरील अपंग प्रमाणपत्र तात्काळ रिनीवल करुन देण्याबाबत निवेदन. देण्यात आले होते. त्याचे दखलना घेतल्यामुळे त्यांनी उपोषण सुरू केले होते. वरील विषयास अनुसरुन खालील प्रमाणे निवेदन अर्ज सादर करतो की, वरील बोक निर्देशित अर्जदार यांना मी चांगले ओळखतो व त्यांनी आपल्या कार्यालयात त्यांचे अपंग कार प्रमाणपत्र रिनीवल करण्यासाठी साल सन २०२२ ते आजपर्यंत अनेक वेळा चकरा मारल्या असुन त्यांना आपल्या कार्यालयाचे कर्मचारी उडवा उडवी चे उत्तरे देवुन परत पाठवत आहेत. वास्तविक जमीन अब्दुल वासेद शेख यांचे अपंग प्रमाणपत्र साल सन २०१७ पासुन सुरु असुन त्यांना सदरील प्रमाणपत्र २०२२ सला मध्ये रिनीवल करणे गरजेचे असल्याने ते आपल्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी वर्गानी त्यांना सांगितले सर्व कागदपत्र तयार करुन त्यांनीरिनीवलचा प्रस्ताव सादर केलेला असुन त्यांना तुम्ही सदरील प्रमाणपत्र बाहेरुन काढून घ्या असे सांगतात व बाहेरील नेट कॅफे मध्ये ऑनलाईन करतांना आपल्या मार्फत रिनीवल चे अप्रूवल देणे गरजेचे आहे. वास्तविक सदरील प्रमाणपत्र अर्जदारांना आपल्या मार्फत आपल्या कार्यालयातुन मिळणे गरजेचे होते तसे न होता प्रत्येक अर्जदारास उडवा उडवीचे उत्तरे देवुन काही न काही कारणे सांगुन काढुन देण्यात येते हि सत्य परिस्थिती आहे का व बाहेरील लोक स्पष्ट सांगतात की तुम्हाला अप्रूवल नसल्या कारणाने सदरील प्रमाणपत्र बाहेरुन निघु शकत नाही. या मुळे अर्जदारास मागील ०३ वर्षापासुन सदरील प्रमाणपत्र रिनीवल करता आलेले नाही हि बाब खुप गंभीर स्वरुपाची असुन अशा धोरणामुळे अपंग लोकांवर खुप मोठा अन्याय होत आहे. न्याय देवुन त्यांचे अपंग प्रमाणपत्र तात्काळ रिनीवल करुन द्यावे व त्यास अप्रूवल देण्यात यावे.तसेच अधिकार सांगतात तुमचे रिन्युअल होणे शक्य नाही व तुम्ही बाहेरुन सिलेंडर करा सिलेंडर केला असता सिलेंडर फॉर्मवर पुन्हा डिफॉल्टर दाखवतात आणि तीन वेळेस सिलेंडर करायला सांगतात आणि तिन्ही वेळेस त्यांने डिफॉल्टर म्हणुन दाखवल आणि ही गोष्ट अधिकाऱ्यांना सांगितली तर सांगितल्यास ते आमची खिल्ली उडवतात अपमानीत करतात. त अशा अधिकाऱ्यावर कारवाई करुन मला सर्टिफिकेट रिनीव्हल करुन द्यावा नसता २१मे बहुजन मुक्ती पार्टी च्या वतीने उपोषण करण्यात येईल असा इशारा देण्यात आला होता.

### 'ॲग्रिस्टॅक' अंतर्गत पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या जमाबंदी आयुक्तालय आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक व वेळेवर मिळवून देण्यासाठी ॲग्रिस्टॅक योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांची व त्यांच्या शेतांची माहिती संकलित करणे आणि त्या माहितीच्या आधारे सरकारी योजनांचे कार्यान्वयन अधिक प्रभावी व सुलभ बनवणे आहे. राज्यातील कृषिक्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या विविध योजनांचा जलदगतीने व परिणामकारकरीत्या शेतकऱ्यांना लाभ देणे सुलभ व्हावे, याकरिता केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक योजना राबविण्यात येत आहे. शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक करण्यात आला असून ॲग्रिस्टॅक अंतर्गतच पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यासाठी सुद्धा फार्मर आयडी बंधनकारक करण्यात आला आहे .पीएम किसान योजनेंतर्गत पात्र सर्व लाभार्थी यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी ॲग्रिस्टॅक अंतर्गत नोंदणी गरजेची आहे. तरी शेतकऱ्यांनी विनाविलंब ॲग्रिस्टॅक नोंदणी करून घ्यावी जेणेकरून कोणताही पात्र शेतकरी पीएम किसान योजनेचा लाभ घेण्यापासून वंचित राहणार नाही, असे आवाहन जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी केले आहे.

# विद्यापीठाने चार जिल्ह्यांतील २३३ महाविद्यालयाचे प्रथम वर्षाचे प्रवेश रोखले

## दरवर्षी तोच घाणा आणि तेच आदेश -ॲड.अजित देशमुख

बीड । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर यांनी शैक्षणिक वर्ष २०२५/२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील चार जिल्ह्यातील दोनशे तेहतीस महाविद्यालयांच्या प्रथम वर्षाचे प्रवेश पूर्णपणे रोखण्याचे आदेश दिले आहेत. दरवर्षी विद्यापीठाचा तोच घाना असतो. यातून काही करोडोची कमाई होत असल्याची चर्चा शैक्षणिक क्षेत्रामध्ये ऐकायला मिळते, असा आरोप ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित देशमुख यांनी केला आहे.

विद्यापीठाच्या उपकुलसचिव (शैक्षणिक विभाग) यांनी दिनांक १७/०५/२०२५ रोजी मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन न केलेल्या संलग्नित महाविद्यालयांची शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रथम वर्षाची प्रवेश क्षमता स्थगित करण्याबाबतचे आदेश जाहीर केले आहेत. विद्यापीठाच्या कार्यक्षमतेचा अभ्यास केला असता दरवर्षी हे आदेश काढले जातात. काही महिन्यात हे आदेश गुंडाळून ठेवले जातात. त्यामुळे विद्यापीठाच्या गुणवत्तेची वाट लागली आहे. त्याला दस्तुर खुद्द विद्यापीठाचे वरिष्ठ अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप देखील देशमुख यांनी केला आहे. नॅक मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकन करून विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. मात्र चांगल्या सुविधा दिल्या जात नाहीत. याची तपासणी विद्यापीठाच्या अधिष्ठाता मंडळ समोर होते. या तपासणीतून महाविद्यालयांची नावे काढली जातात. त्यांची प्रवेश क्षमता शून्य करण्यात येते. मात्र दरवर्षी तोच घाणा घालून विद्यापीठ शैक्षणिक गुणवत्ता ढासळवत आहे. विद्यापीठाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ८७ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यातील ६४ महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. त्याचप्रमाणे जालना जिल्ह्यातील ५१ इतके महाविद्यालयांची तर धाराशिव येथील ३१ इतक्या महाविद्यालयांची प्रवेश क्षमता रोखली आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तब्बल २३३ महाविद्यालय नियमाचे उल्लंघन करून महाविद्यालय चालवीत असल्याचे या निमित्ताने पुन्हा एकदा उघडकीस आली आहे.महाविद्यालय चालवणाऱ्या संस्थाचालकांना त्याचबरोबर तेथील प्राचार्य, प्राध्यापक यांना आणि विद्यापीठाच्या कुलगुरू पासून ते वेगवेगळया विभागाचे उपकुलसचिवांपर्यंत एक साखळी निर्माण झाली आहे. ही साखळी विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधा पुरवीत नाही. तरी देखील कोट्यावधी रूपयांचे पगार दर महिन्याला केले जातात. जाणीवपूर्वक केले जाणारे हे कृत्य विद्यापीठ थांबवत नाही, तोपर्यंत मराठवाड्यातील गुणवत्ता वाढणार नाही, असेही ॲड. अजित देशमुख यांनी म्हंटले आहे.

### बीड जिल्ह्यातील प्रवेश रोखलेल्या महाविद्यालयांची यादी

आदित्य कॉलेजचे एम.बी.ए., व अध्यापक, शाहू अध्यापक महाविद्यालय मोरेवाडी अंबाजोगाई, कला वाणिज्य आणि विज्ञान कॉलेज कुसळंब,

अब्दुल कलाम कॉम्प्युटर सायन्स कॉलेज नेकनूर, कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वुमन्स बीड, केशवराज सीनियर कॉलेज दासखेड, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी बीड, साईराम आर्ट्स सायन्स कॉलेज, भाऊसाहेब पाटील कॉलेज केज, रामचंद्र धस कॉम्प्युटर कॉलेज आष्टी, संभाजी संभाजी राजे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट सायन्स शिरूर कासार, श्री बीएसपीएम अध्यापक महाविद्यालय अंबाजोगाई, जनता आर्ट, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज धानोरा, अध्यापक महाविद्यालय कारी, आदित्य इंजीनियरिंग कॉलेज बीड, एसएसपीएमएस कॉलेज ऑफ एज्युकेशन आष्टी, जनविकास महाविद्यालय आपेगाव, राजमाता जिजाऊ आर्ट सायन्स अँड कॉमर्स कॉलेज मादळमोही, संत भगवान बाबा कॉलेज केज, गुरु विरोपक्ष कला महाविद्यालय मानूर, गुरुकुल कॉलेज ऑफ एज्युकेशन बीड, तुलसी कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी बीड, गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ एज्युकेशन अंबाजोगाई, स्वामी विवेकानंद कॉलेज परळी, तांबवेश्वर कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स केज, भगवानराव केदार कॉलेज वारणी, कला आणि विज्ञान महाविद्यालय आष्टी, पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर अध्यापक महाविद्यालय गढी, संत भगवान बाबा कला विज्ञान कॉलेज घाटशीळ पारगाव, शंकरराव गुट्टे ग्रामीण महाविद्यालय धर्मापुरी, गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी माजलगाव, मिठूलालजी सारडा एमबीए कॉलेज बीड, याशिवाय अनेक महाविद्यालयाचा यात समावेश आहे. या सर्व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊ नयेत, असे ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

# बालविवाह व बालमजूरी आढळून आल्यास कडक कारवाई करणार-तहसिलदार वैशाली पाटील

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

तालुक्यात बालविवाहांच्या घटना घडू नये अल्पवयीन मुलांकडून काम करुन न घेता बालमजूरी थांबावी यासाठी प्रबोधन, जनजागृती करत असतांना कठोर उपाययोजना कराव्यात त्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे,अशा प्रकरणातील जबाबदार व्यक्ती व दोषींवर कडक कारवाई करा, असे निर्देश आष्टीचे तहसिलदार वैशाली पाटील यांनी दिले आहेत. या पार्श्वभूमीवर आष्टी तालुक्यात बालविवाह मुक्त व बालमजूरी यासाठी आष्टी तालुक्याची बालसंरक्षण समितीची बैठक तहसिलदार वैशाली पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात बुधवार दि २१ में रोजी सकाळी १२ वाजता संपन्न झाली. यावेळी पुढे त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की शिक्षण विभाग, पंचायत विभाग, आरोग्य विभाग, गाव पातळीवरील पोलीस पाटील, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर यासारखे कर्मचारी यांची बालविवाह रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. त्यासाठी बाल कामगार, शाळा माध्य, मुले यांबाबतही जणजागृती करण्यात यावी, ग्रामस्तरावर ग्राम कृती दल स्थापन करण्यात यावे.ग्राम बाल संरक्षण समिती, शाळा व्यवस्थापन समिती यासारख्या समित्यांमधील सदस्य ही महत्त्वाचे योगदान देऊ शकतात. बालविवाहाच्या घटना



घडल्यास त्यास जबाबदार व्यक्तिंवर कारवाई होणे आवश्यक आहे. नागरिकांनी आपल्या सभोवताली कुठे बालविवाह होत असल्यास त्याची माहिती १०९८ व ११२ या टोल फ्रि क्रमांकावर द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल, असेही तहसीलदार पाटील यांनी बोलताना सांगितले.या बैठकीस बाल संरक्षण समितीचे सचिव बाल एकात्मिक विकास प्रकल्प अधिकारी ज्योती बेल्हेकर,बाल संरक्षण समीतीचे सदस्य पोलिस निरीक्षक शरद भुतेकर,आरोग्य विभागाचे प्रतिनिधी डॉ पवन इंगोले,स्थानिक सामाजिक प्रतिनिधी अविनाश कदम, अनिरुद्ध धर्माधिकारी, विकास मस्के,बाल प्रतिनिधी प्रतिक अशोक पवार,ओम वाल्हेकर, शिक्षण विभागाचे सोनवणे,बाल संरक्षण कक्ष प्रतिनिधी राजेंद्र गळगटे आदी संरक्षण समितीचे सदस्य उपस्थित होते.

### मंगल कार्यालय चालकांनी पुराव्यानिशी लग्न बुकींग करावी

तालुक्यातील सर्व विवाह मंगल कार्यालये, फंक्शन हॉल चालकांनी वधू आणि वर यांच्या जन्मासंबंधी पुरावा म्हणून आधार कार्ड न घेता निर्गम उतारा किंवा शाळेचा दाखला पुरावा घेण्यात यावा तेव्हाच विवाहाची बुकींग करून घ्यावी अन्यथा बाल विवाह झाल्यास संबंधित मंगल कार्यालय चालक व बॅन्ड वाजंत्री वाले,आचारी आणि इतर व्यक्तीनवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश तहसीलदार वैशाली पाटील यांनी दिले.

## जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेटवर अवसायकाची नियुक्ती; संघर्ष कृती समितीच्या प्रयत्नाला यश

बीड । प्रतिनिधी

**सहकार आयुक्त महाराष्ट्र पुणे यांच्या शिफारसीनुसार मुख्य रजिस्टर भारत सरकार यांनी जिजाऊ मासाहेब मल्टीस्टेट करिता माजलगावच्या सब रजिस्टर म्हणून नियुक्ती केली आहे.जिजाऊ मासाहेब मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीने २०२३ दोनशे कोटी ठेव रकमेचा घोटाळा करून हजारो ठेवीदारांना गंडवले.**

ठेवीदार संघर्ष कृती समितीच्या वतीने पाठपुरावा चालू आहे. यापूर्वीच एमपीआयडीचा प्रस्ताव मंजूर करून आणला असून जप्तीची कारवाई चालू आहे. संघर्ष कृती समितीचे मार्गदर्शक अशोकराव हिंगे, ॲड. आप्पासाहेब जगताप, भास्करराव मिसाळ, इंजि. मारुतीराव वनवे यांनी मुख्य रजिस्टर भारत सरकार यांची भेट घेऊन अवसायकाची मागणी करणार प्रस्ताव दाखल केला होता. त्यांच्या प्रयत्नाला यश आले असून आज आवसायिकाची नियमाप्रमाणे नियुक्ती करण्यात आली आहे. या पाठपुरावा करिता जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सहकार्य केले. आवसायिकाच्या नियुक्तीमुळे ठेवीदारांमध्ये आनंद व्यक्त केला जात असून लवकरच ठेवीदाराला न्याय मिळण्याच्या कामी मदत होणार आहे.या निर्णयाची संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष शेख कुतुब भाई, मारुती तिपाले, सखाराम कळासे, डॉ अरविंद काकडे, लक्ष्मण हाटवटे, भाऊसाहेब परसे, बांगर ताई, सूर्यभान नवले आधी ठेवीदारांनी आनंद व्यक्त व्यक्त करून मुख्य रजिस्टार यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## भोगवटाधारकांना मालकी हक्क देऊन त्यांना न्याय मिळवून देणार -राजकिशोर मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात अनेक ठिकाणी नवीन वस्त्या त्याचबरोबर काही जागांवर अतिक्रमण करून अनेक वर्षे पासून शेकडो कुटुंब भोगवट्यामध्ये रहात आहेत. अशा कुटुंबाना मालकीमध्ये घेऊन त्यांना त्यांच्या मालकीच्या पिटीआर द्याव्यात अशी मागणी अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. शहरातील विविध वस्त्यामधील भोगवटा धारकांना मालकीत घेऊन त्यांना त्यांचा हक्क व न्याय मिळवून देणार असल्याचे राजकिशोर मोदी यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.



अंबाजोगाई शहरातील भोगवटा धारकांच्या नोंदी मालकीमध्ये घेवून मालकीच्या पीटीआर देण्याच्या मागणीचे राजकिशोर मोदी यांचे जिल्हाधिकारी याना निवेदन

वरील मागणीसाठी सादर केलेल्या निवेदनामध्येअंबाजोगाई नगर परिषद हद्दीतील असणाऱ्या लोक वस्त्यामधील अतिक्रमण धारकांच्या घरांच्या नोंदी भोगवटयामध्ये आहेत. ज्यामध्ये क्रांती नगर, लाल नगर, कबीर नगर, रायगड नगर, सिद्धार्थ नगर, मिलिंद नगर, गांधी नगर ,बोधी घाट, पेन्शन पुरा, सदर बाजार, समता नगर, भीम नगर, दमदम पुरा, शाह बट्टा, गवळी पुरा या अशा इतर वस्त्या गेल्या अनेक वर्षापासून वसलेल्या आहेत. तेथे हजारो कुटुंब आपल्या कुटुंबियांसह वास्तव करत आहेत.

२००९ साली महाराष्ट्र शासनाने परिपत्रक काढून सदरच्या अतिक्रमण धारकांच्या भोगवट्यातील नोंदी मालकीत घ्याव्यात असा स्पष्ट उल्लेख केला आहे. मात्र भूमी अभिलेख ◀◀ पान ३ वर

## पाटोदा एसटी आगारातील चार्जिंग स्टेशन कित्येक दिवसांपासून बंद



पाटोदा । प्रतिनिधी

इलेक्ट्रॉनिक बस साठी पाटोदा आगारात चार्जिंग टेशन उभारले गेले परंतु वर्ष झाले तरी चार्जिंग टेशन तयार झाले मात्र बस उपलब्ध नसल्याने चार्जिंग टेशन धुळखात पडून आहे वाटू पाटोदा द्यायला ई बस कधी मिळणार असा सवाल प्रवासी करत आहेत इंधनाच्या वाढत्या किमतीमुळे राबम आर्थिक अडचणीत आहे इलेक्ट्रॉनिक ◀◀ पान ३ वर

## सुलेमान देवळा ग्रामस्थांची कामे रखडली

### सतत गैरहजर असणाऱ्या ग्रामसेवकावर कारवाई करा, ग्रामस्थांची मागणी

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

**आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथे कार्यरत असलेले ग्रामसेवक शिंदे हे गेल्या कित्येक महिन्यापासून गैरहजर असून यामुळे ग्रामस्थांची वेगवेगळ्या प्रकारची कामे रखडली आहे अशा या कामचुकार अधिकार्याची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी सुलेमान देवळा ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.**

अधिक माहिती अशी की ग्रामसेवक उद्धव शिंदे हे गेली दोन महिन्यांपासूनही जास्त दिवसांपासून सुलेमान देवळा ग्रामस्थांसाठी ते उपलब्ध नाहीत लोकांची कामे रखडली गेली आहेत. कामे घेऊन लोकांना थेट आष्टीला जावे लागत आहेत. सध्या घरकुलांची कामे चालू असून बरेच लोकांची पैसे अभावी कामे रखडली आहेत. अशा या भ्रष्ट अधिकारी ची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी सुलेमान देवळा येथील युवा कार्यकर्ते शिवम घोडके सागर देसाई नंदराज घोडके तुकाराम घोडके यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

प्रभारी कोट

ग्रामसेवक शिंदे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी मी दररोज हजर असल्याचे सांगितले.

## बीड पथकाने रोखले एकत्र होणारे दोन बालविवाह

बीड । प्रतिनिधी

पोलीस स्टेशन बीड ग्रामीण हद्दीत पांगरबावडी या गावी सखाराम मोगलाजी संकोड, व गंगाराम गंगाधर अनारसे यांचे घरी एकत्र दोन बालविवाह होत असल्याचे गोपनीय माहिती -ढक्ण पथकास मिळाली होती,त्या नुसार -क्ढण पथकाने सदर ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते व पांगर बावडी गावाचे बालविवाह अधिकारी यांनी भेट दिली असता लग्नातील दोन्ही नवरी मुली अल्पवयीन मिळून आल्या.ही कारवाई २२ मे रोजी करण्यात आली.

शिक्षणाचा अभाव, भटके जीवन, तसेच कायद्याबद्दलचे अज्ञान, तरुण मुलींना वयात आल्यानंतर सांभाळायचे कसे?अशी अनेक कारणांमुळे मुलीचा विवाह लावत असल्याचे पालकांनी सांगितले, दोन्ही कडील आई वडील नातेवाईक, यांना -क्ढण पथकाने कमी वयातील लग्नामुळे मुलींच्या शरीरावर होणारे गंभीर परिणाम, लहान वयात पडणाऱ्या जबाबदाऱ्या, कुपोषित अपत्य, शिक्षणाचे महत्त्व अशा सर्व समुपदेशन करून मुलीचा विवाह अठरा वर्षे झाल्याशिवाय लावून देणार नाही, असे ◀◀ पान ३ वर

## अंबाजोगाईच्या लेकीनंतर जावयानेही मिळविले केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश

### अंबाजोगाईकरांच्या मानपानात लेकीनंतर जावायाच्या रुपानेही मानेचा तुरा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नुकत्याच पार पडलेल्या परीक्षेमध्ये आंबेजोगाईच्या जावयाने क्रमांक दोन (२) रँक संपादित करीत मोठे घवघवीत यश संपादित केले आहे.**

नुकत्याच यु.पी.एस.सी. च्या अंतिम निकालात अंबाजोगाई येथील नामांकित मेडीसीन तज्ञ डॉ.सौ.शुभदा अभिजीत लोहिया-राठी आणि निवृत्त प्रा.अभिजीत द्वारकादासजी लोहिया यांचे जावई आनंद खंडेलवाल यांनी आय.एफ.एस. () साठी संपादित केलेल्या दैदिप्यमान यशाने लोहीया-राठी कुटुंबासह संपूर्ण अंबाजोगाईकरांच्या शिरपेचात आणखी एक मानेचा तुरा खोवला गेल्याने लेकीच्या म्हणजेच मुलगी अनुष्काच्या मोठ्या यशा पाठोपाठ जावईबापुनेही सासरवाडीची मान मोठ्या प्रमाणात उंचावली असून आय.एफ.एस. लेकीच्या यशाचा आनंद पूर्णतः विरघळला नाही तोवरच जावायाने त्या आनंदात मोठी भर टाकली असून आनंद च्या यशाने हा आनंद आता नक्कीच द्विगुणित झाला ◀◀ पान ३ वर



## ना.संजय सिरसट यांच्या नागरी सत्कारास हजारोच्या संख्येने उपस्थित राहा-शेख फेरोज

माजलगाव । प्रतिनिधी

राज्याच्या सामाजिक न्याय मंत्रीपदी तथा छत्रपती संभाजी नगरच्या पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल ना.संजय सिरसट यांच्या नागरी सत्काराचे आयोजन माजलगाव येथे दि.२४ मे शनिवार रोजी बहुजन समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.या नागरी सत्कारास हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बहुजन विकास मोर्चाचे अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष शेख यांनी केले आहे.




शहरातील जुना मोंढा येथे आयोजित करण्यात आलेल्या या नागरी सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन नेते बाबुराव पोटभरे असणार आहेत.तर स्वागत अध्यक्ष उपसभापती श्रीहरी मोरे, सचिन डोंगरे हे भूषवणार आहेत. त्याचप्रमाणे कार्यक्रमात माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, आ.प्रकाश सोळंके आ.सुरेश धस,आ. विजयसिंह पंडित,आ.नमिता मुंदडा,शिवसेनेच्या युवा नेत्या हर्षदा सिरसट यांची उपस्थिती असणार आहे.दुपारी चार वाजता गायनाचा कार्यक्रम पेढे तुला व नागरी सत्कार असा भव्य दिव्य कार्यक्रम होणार आहे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजन समिती नवनाथ धायजे,राजेश साळवे, भीमराव टाकणखार,प्रशांत ससाने, सदानंद प्रधान,मुरलीधर साळवे, सचिन जावळे,विठ्ठल पंडित,राहुल मस्के,अशोक लांडगे,प्रदीप पट्टेकर, वसंत वाव्हळकर,बाबा शेख,विजय धाईजे,विनोद शिंदे,अभिजीत पोटभरे,अक्षय मोरे,सदानंद प्रधान, बाबा वाघमारे,नितिन काळे,किरण खळगे,विजय साळवे,धर्मा मोरे, आकाश माने, दीपक टाकणखार, जयदीप तांगडे,विठ्ठल पंडित,लखन हजारे इत्यादी बहुजन विकास मोर्चाची सर्व टीम काम करीत असून या कार्यक्रमास हजारच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बहुजन विकास मोर्चेचे अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष शेख फिरोज यांनी केले आहे.

## पाटोद्यातील जमावबंदी कार्यालयाला दहा दिवसांपासून कुलूप

पाटोदा । प्रतिनिधी

महसूल विभागातील जमावबंदी विभाग प्रमुख मानला जातो परंतु यातील अधिकारी चक्र रजाना टाकता पदभार न देता गायब असल्याची माहिती मिळत आहे जमाबंदी कार्यालय गेल्या पंधरा दिवसापासून कुलूप बंद स्थितीत आहे जमाबंदी कर्मचारी कार्यालयाकडे येत नसल्यामुळे विविध कामासाठी येणाऱ्या नागरी करणारे कमी हाताने परत जावे लागत आहे जिल्हाधिकारी विलक्षण देण्याची मागणी नागरिक करीत आहे तहसीलदार कार्यालयात आलेल्या जमाबंदी कार्यालयात नियुक्त अधिकारी गेल्या पंधरा दिवसापासून कार्यात येत नसतात त्यामुळे तालुक्यातील येणारे सामान्य नागरिक शेतकरी यांचे कामे होत नाहीत त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे शिवाय आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी कार्यालयाकडे फिरकत नाही त्यामुळे पावसाची नोंद शेतकरी आत्महत्या आधीची माहिती शासनापर्यंत पोहोचत नसल्यामुळे शेतकऱ्यांना मदत मिळत मिळण्यास अडथळे येत आहेत जमाबंदी आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कार्यालय पंधरा दिवसापासून बंद आहे अधिकारी कर्मचारी हजर नसल्याने विचारले असता आम्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवले आहे असे प्रभारी तहसीलदार अभय कुमार जोशी यांनी सांगितले.



## राज्य स्तरावर शेकडो पारितोषिक आर्ट ऑफ फन अकॅडमीने पटकावली -दिपाताई क्षीरसागर

### आर्ट ऑफ फनच्या बालकलावंताना सिनेमात काम करण्याची संधी देवू - अभिनेते सुधीर निकम

गेवराई । प्रतीनिधी

शहरातील नामांकित आर्ट ऑफ फन अकॅडमी च्या वतीने डान्स अ‍ॅण्ड ॲक्टींग शिबिराचे आयोजन १० मे ते २० मे २०२५ या दरम्यान करण्यात आले होते. दहा दिवसीय शिबीरात सिने अभिनेते, दिग्दर्शक गणेश देशमुख, रवि धुताळमल, अशोक कानगुडे, नृत्यांगना वैभवी टाकणखार यांनी बालकलाकारांना शिबिरात प्रशिक्षण दिले. दि २० मे मंगळवार रोजी बालरंगभूमी परिषदेच्या राज्य उपाध्यक्षा सौ डॉ.दीपाताई क्षीरसागर, दिग्दर्शक अभिनेते डॉ.सुधिर




निकम,नाट्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संजय पाटील,पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर,शाहिर विलास सोनवणे,पत्रकार ॲड.शेख हारुन, युवा उद्योजक पांडुरंग मोहिते,यांच्या उपस्थितीत आर्ट ऑफ फन डान्स अ‍ॅण्ड ॲक्टींग शिबर मोठ्या उत्साहात संपन्न झाला. आर्ट ऑफ फन अकॅडमी च्या बालकलाकार आतिशिय जिद्द आणि चिकाटीने नाटकात सहभागी होवुन उत्कृष्ट अभिनय सादर करत आहेत त्यामुळे या अकॅडमिच्या बालकलाकारांना सिनेमा मध्ये ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ५०० कोटींच्या घोटाळ्याचा आरोप असणारे वैष्णवीचे मामासासरे, आयजी सुपेकरांचा दबाव



## अंजली दमानियांचा दावा

पुणे : पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरणाता पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून सासरे राजेंद्र हगवणे आणि थोरला दीर अद्याप फरार आहेत. याप्रकरणी, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आरोपींच्या अटकेसाठी पोलिसांना निर्देश दिले आहेत. कारण, राजेंद्र हगवणे हे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी होते. त्यामुळेच, पोलिसांवर दबाव टाकून त्यांच्याकडून हे प्रकरण दाबलं जात असल्याचा आरोप वैष्णवीच्या वडिलांनी केला होता. आता, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी याप्रकरणी एका आयजी अधिकाऱ्याकडे अंगुलीनिर्देश केले आहेत. वैष्णवीच्या नवऱ्याचे मामा हे खत्र म्हणजेच पोलीस महानिरीक्षक आहेत, त्यांच्या मी माहिती घेतली असून या मामांचा धाक दाखवून दोन्ही सुनेवर हगवणे कुटुंबीयांनी अत्याचार केल्याचा दावा अंजली दमानिया यांनी केला आहे. जालिंदर सुपेकर या शशांकच्या खत्रमामावर ५०० कोटींच्या स्कॅम संदर्भात चौकशी सुरू आहे, एवढच नाहीतर जळगाव मध्ये झडख सादरे जे होते त्यांना, या IG नेच त्रास दिल्याचे पत्र लिहून त्यांनी आत्महत्या करणार असल्याचं म्हटलं होतं, अशी माहिती अंजली दमानिया यांनी व्हिडिओच्या माध्यमातून दिली.

जालिंदर सुपेकर हे पोलीस महानिरीक्षक असून ते वैष्णवीचे मामा सासरे म्हणजेच शशांक हगवणेचे सख्खे मामा आहेत. मयुरी जगताप जी हगवणेंची मोठी सून आहे, तिने पोलीस स्टेशनमध्ये नोंदवलेल्या एफआयआरवेळी देखील हगवणे कुटुंब फरार होते. तेव्हा, वैष्णवीच्या नणंदेने पोलीस स्टेशनमध्ये जाऊन तक्रार दाखल केली होती. म्हणजेच, फरार व्यक्ती पोलीस स्टेशनमध्ये जाते आणि मयुरीच्या आई आणि भावा विरुद्ध ऋखठ करते, आणि पुन्हा गायब होते. तसेच, तू आमचं काहीही बिघडू शकत नाही, आमचे हात फार मोठे आहेत, अशी धमकी देते, अशी माहिती अंजली दमानिया यांनी दिली आहे. मला असं वाटतं की, हे कुटुंब अतिशय विकृत मानसिकताचं आहे, यामध्ये सरकारने कारवाई केली पाहिजे, अशी मागणीही दमानिया यांनी केली.

**हगवणे कुटुंबीय माझे दूरचे नातेवाईक – सुपेकर**

हगवणे कुटुंबीय हे माझे दूरचे नातेवाईक असून, त्यांच्याशी निगडित प्रकरणात माझा कसलाही संबंध नाही. त्यासोबतच गेल्या कित्येक महिन्यांपासून आमचा त्यांच्याशी संवादही झाला नाही. मलाही दोन मुली असून, अशा गंभीर अन निर्घृण कृत्याचे समर्थन कोणताही बाप करूच शकत नाही. आरोपींना त्यांच्या कृत्याची सजा व्हायलाच हवी, ही माझी स्पष्ट भूमिका आहे, असे पोलीस महानिरीक्षाक डॉ. जालिंदर सुपेकर यांनी बोलताना म्हटले.

# दहावी–बारावीची पुरवणी परीक्षा २४ जूनपासून होणार सुरू




पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे जून–जुलैमध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या वेळापत्रकानुसार दहावी–बारावीची पुरवणी परीक्षा २४ जून रोजी सुरू होणार आहे. बारावीची लेखी परीक्षा २४ जून ते १६ जुलै आणि दहावीची लेखी परीक्षा २४ जून ते ८ जुलै या कालावधीत घेतली जाणार आहे, अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी दिली आहे.

राज्य मंडळातर्फे फेब्रुवारी–मार्चमध्ये झालेल्या दहावी–बारावीच्या परीक्षेतील अनुत्तीर्ण, एटीकेटी प्राप्त विद्यार्थी, श्रेणी सुधार करू इच्छिणारे विद्यार्थी यांना संधी मिळावी, यासाठी ही पुरवणी परीक्षा घेतली जात आहे. यापूर्वी पुरवणी परीक्षा जुलै–ऑगस्टमध्ये घेण्यात येत होती. यंदा मात्र पुरवणी परीक्षा जून–जुलैमध्येच होणार आहे.

परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक राज्य मंडळाच्या 'www.mahahsscboard.in' संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकाची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल.

त्या छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी आणि अन्य संकेतस्थळांवरील, अन्य यंत्रणेने छपाई केलेले, अन्य माध्यमांतील वेळापत्रक ग्राह्य धरू नये, असे राज्य मंडळाने स्पष्ट केले आहे. बारावीची माहिती तंत्रज्ञान, सामान्यज्ञान विषयाची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने १५ आणि १६ जुलै रोजी होणार असल्याचेही मंडळाने सांगितले.

# महिला आयोगाचा कारभार म्हणजे वराती मागनं घोडं



पुण्यातील मुळशी तालुक्यातील वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणाने राज्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात रोज नवनवीन खुलासे होत असून वैष्णवीच्या आई वडिलांकडून सासच्या लोकांवर गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणात पती शशांक राजेंद्र हगवणे, सासू लता राजेंद्र हगवणे, नणंद करिश्मा राजेंद्र हगवणे यांना अटक करण्यात आली आहे. तर सासरा आणि दीर फरार असून त्यांचा पोलीस शोध घेत आहेत.

या प्रकरणी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर आणि भाजपा महिला नेत्या चित्रा वाघ यांच्यावर शरद पवार गटाच्या रोहिणी खडसे यांनी जोरदार टीका केली आहे.

रोहिणी खडसे यांनी म्हटले आहे की, आपल्या महिला आयोगाचा कारभार हा असा आहे 'वराती मागनं घोडं'. बरं, बाईंचा आविर्भाव पण असा की जणू काही कोणत्या तरी चांगल्या कामासाठी देशाला संबोधित करत आहेत, अशी टीका त्यांनी केली.तसेच कालपरवा छगन भुजबळांनी मंत्रीपदाची शपथ घेतली असताना बाई सर्वात आधी स्वागतासाठी उभ्या होत्या. समोर मीडिया होती, पण त्यावेळी बाईंनी वैष्णवीच्या केसवर बोलणे टाळले. त्यामुळे या प्रतिक्रियेवर आम्हाला वाटते की 'दाल में कुछ काला है !' ही जबरदस्तीने द्यायला सांगितलेली प्रतिक्रिया आहे का? हा प्रश्न आमच्या मनात आहे, असंही रोहिणी खडसे यांनी म्हंटल आहे

# जेजुरी एमआयडीसीतील १५.८० लाखांची चोरी उघडकीस; पाच आरोपी गजाआड

**जेजुरी । प्रतिनिधी**

**जेजुरी येथील एमआयडीसी परिसरातील अलोक इंडस्ट्रीज कंपनीतून १५.८० लाख रुपये किमतीचे अलॉय स्टील बार चोरीच्या प्रकरणात जेजुरी पोलिसांनी तात्काळ कारवाई करत पाच आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून ८.९५ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल, ३ लाखांचा छोटा हत्ती वाहन आणि ६० हजार रुपये किमतीची दुचाकी हस्तगत केली आहे. या प्रकरणी आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून, एमआयडीसी परिसरातील चोरीच्या तक्रारींसाठी नागरिकांना जेजुरी पोलिस स्टेशनशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**




जेजुरी, विद्यानगर येथील रहिवासी गोपाळ बुलाकीदास लढ्ढा (वय ६७) यांनी त्यांच्या अलोक इंडस्ट्रीज (प्लॉट क्र. सी–४/२५, एमआयडीसी, जेजुरी) येथून १५,८०,५१५ रुपये किमतीचे अलॉय स्टील बार (३४ सीआरएनआयएमओ ६, डायमिटर ४५/४६) अज्ञात व्यक्तीने चोरी केल्याची तक्रार १६ मे रोजी जेजुरी पोलिस स्टेशनला नोंदवली. यावरून गु.र.नं. १८०/२०२५ अंतर्गत भादंवि कलम ३०३(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा दाखल होताच जेजुरी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळाला भेट देऊन सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान मुख्य आरोपी ज्ञानेश्वर मिनीनाथ कांबळे (रा. बारसोडेनगर, जेजुरी) याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली आणि साथीदार राहुल सतोष वाघरी (रा. जुनी जेजुरी), रूषम राम चव्हाण (रा. जेजुरी), अमित सुरेश वाघरी (रा. जुनी जेजुरी) आणि पवन जगन्नाथ पोतदार (रा. खोमणेआळी, जेजुरी) यांच्यासह गुन्हा केल्याचे उघड केले. पोलिसांनी सर्व आरोपींना ताब्यात घेऊन अटक केली.

आरोपींना सासवड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर करून ९ दिवसांची पोलीस कोठडी मिळवली. तपासादरम्यान पोलिसांनी ८,९५,६८५ रुपये किमतीचे अलॉय स्टील बार (३४ सीआरएनआयएमओ ६, डायमिटर ४५/४६), ३ लाख रुपये किमतीचे छोटा हत्ती वाहन आणि ६० हजार रुपये किमतीची दुचाकी जप्त केली. उर्वरित मुद्देमाल हस्तगत करण्यासाठी आणि आरोपींनी अन्य गुन्हे केले आहेत का, याचा तपास सुरू आहे.

# टिटेघरच्या सरपंच शशिकला नवघणे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

भोर: टिटेघर ( ता. भोर ) येथील विद्यमान सरपंच शशिकला नारायण नवघणे यांच्यासह विविध पदाधिकार्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. रामबाग, भोर येथील कार्यालयात मंगळवारी (दि. २०) उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आमदार शंकर मांडेकर, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रणजित शिवतरे यांनी केलेल्या विकासकामांवर प्रभावित होऊन अनेक पदाधिकार्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

यामध्ये टिटेघर ग्रामपंचायतीच्या सरपंच शशिकला नारायण नवघणे, माजी सरपंच बाप्पू भाऊ नवघणे यांच्यासह नारायण भिकू नवघणे, कृष्णा सणस, अंकुश शिंदे यांचा समावेश आहे. यावेळी विकास सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत पिसाळ, माजी सरपंच दिनकरराव नवघणे, बापू निगडे, शंकरराव तावरे, ज्ञानोबा भोईटे, दत्तात्रेय नवघणे, संपत निगडे, संतोष नवघणे, संदीप नवघणे आदी उपस्थित होते. राष्ट्रवादीच्या माध्यमातून गावातील उर्वरित विकास कामांच्या निधीसाठी प्रयत्न केला जाणार असल्याचे शिवतरे यांनी या वेळी सांगितले.

# पुण्यात हुंड्याच्या छळाला कंटाळून आणखी एका नववधूची आत्महत्या; हडपसरमधील घटनेने खळबळ

पुणे : वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाची चर्चा ताजी असतानाच पुण्याच्या हडपसर परिसरात हुंड्याच्या छळाला कंटाळून आणखी एका नववधूने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. देवकी प्रसाद पुजारी ऊर्फ दीपा (वय २२) असे या विवाहितेचे नाव असून, तिच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीनंतर हडपसर पोलिसांनी पतीसह सासरच्या मंडळींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



या घटनेने पुणे शहरात खळबळ उडाली असून, समाजात हुंड्यासारख्या जुन्या प्रथांचा पायंडा अजूनही कायम असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दीपाचा विवाह १८ एप्रिल रोजी विजयपूर येथील बागेवाडी येथील बसव मंगल कार्यालयात प्रसाद चंद्रकांत पुजारी याच्याशी झाला. लग्नात दीपाच्या कुटुंबीयांनी ४ तोळे सोने आणि १० लाख रुपये खर्चून मानपान केले होते. मात्र, लग्नाच्या दुसऱ्याच दिवशी पुण्यात आल्यानंतर दीपाचा पती प्रसाद आणि सासू सुरेखा यांनी भांडी, फ्रीज यांसारख्या वस्तू दिल्या नाहीत, तसेच मानपान केला नाही म्हणून तिला शिवीगाळ आणि छळ सुरू केला.

दीपाने ही हकीगत वडिलांना सांगितल्यानंतर ती माहेरी गेली. सासऱ्याने समजूत घालून तिला पुन्हा पुण्यात आणले. मात्र, १८ मे रोजी दीपाने वडिलांना फोनवर रडत सांगितले की, पती, सासू, सासरे आणि दीर यांच्याकडून मारहाण आणि शिवीगाळ होत आहे. वडिलांनी तात्पुरती समजूत घातली, पण १९ मे रोजी दीपाने हडपसर येथील राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.दीपाचे वडील गुरुसंगप्पा म्यागेरी यांच्या तक्रारीवरून हडपसर पोलिसांनी पती प्रसाद चंद्रकांत पुजारी, सासू सुरेखा, सासरे चंद्रकांत आणि दीर प्रसन्ना यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

# भुजबळांना डावलले म्हणून आंदोलन करणाऱ्यांनी मंत्री केल्यावर ढोल का वाजवले नाहीत?–पवार

बारामती: महायुती सरकाच्या शपथविधी वेळी छगन भुजबळ यांना डावलले म्हणून आंदोलन करणाऱ्यांनी आता त्यांना मंत्री केल्यावर ढोल का वाजवले नाहीत ? असा सवाल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला. मी ३५ वर्षाच्या राजकीय जीवनात कधीही जातीयवाद केला नसल्याचे पवार म्हणाले.



बारामतीत मेळाव्यात बोलताना अजित पवार यांनी एका कार्यकर्त्याचे नाव घेतले. भुजबळांना मंत्रीमंडळात घेतले नाही तर तुम्ही आंदोलन केले. आता त्यांना मंत्री केले आहे, मग ढोल का नाही वाजवले असा सवाल पवार यांनी केला. अजित पवार कधीही जातीयवाद करत नाही. मी जातीयवाद करतो असे सांगणारा कोणीही मायचा लाल दाखवा. ३५ वर्षात मी कुठे जातीयवाद केला हे दाखवून द्या. एवढे सगळ्यांनी मी बरोबर घेवून जातोय. मार्ग काढतोय. वेगवेगळ्या संधी देतोय तरी तुम्ही आंदोलन करता.

छगन भुजबळ यांना मंत्रीमंडळात संधी दिली असली तरी त्यांना राज्यसभेत मी पाठवणार आहे. शेवटी प्रमुख नेत्यांना योग्य तो मानसन्मान दिलाच पाहिजे. माहिती घ्यायची नाही.. काही नाही.. अन आंदोलन करत सुटायचे. आणि त्या आंदोलनावेळी आपण फोटोत दिसू नये म्हणून काही जण तर तोंड लपवत मागे थांबायचे काम करत होते. मी कधी असे लपूनछपून राजकारण केले का ? असे म्हणत पवार यांनी टोलेबाजी केली.

# नालेसफाई व्यवस्थित न केल्यास महापालिकेत आंदोलन, रवींद्र धंगेकर यांचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नालेसफाईची कामे हातात घेतली, पण ही कामे योग्य पद्धतीने केली गेली नसल्याने गटारी तुंबत आहेत. महापालिकेने व्यवस्थित न केल्यास तुंबलेले पाणी महापालिकेत आणून आंदोलन केले जाईल, असा इशारा शिवसेनेचे महानगर प्रमुख रवींद्र धंगेकर यांनी दिला.



अवकाळी पावसामुळे पुण्यात सगळीकडे पाणी साचल्याने जनजीवन विस्कळित झाले. या पार्श्वभूमीवर महानगर प्रमुख रवींद्र धंगेकर यांनी महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांच्याकडे तक्रार केली आहे. शहरात दोन दिवसात केवळ तासभर झालेल्या अवकाळी पावसामुळे सर्वच प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचले. अनेक भागात नाले, चेंबर तुंबलेले होते. त्यामुळे रस्त्यावर पाणी साचण्याचे प्रमाण वाढत गेले.

मे महिन्यात केवळ तासभर झालेल्या अवकाळी पावसातील ही स्थिती. पावसाळा अजून सुरूही झाला नाही. त्याआधीच पुणेकरांना रस्त्यावर साचलेल्या, घरात घुसलेल्या पाण्यात अडकून राहावे लागले. पावसाळी कामांचे कोट्यवधी रुपये 'पाण्यात' गेले आहेत.त्यामुळे आयुक्तांनी संबंधितांवर काय कारवाई करावी. ही कामे पारदर्शकपणे झाली असती तर अशी दाणादाण उडाली नसती. भविष्यात असा प्रकार घडू नये यासाठी तातडीने उपाययोजना करावी अन्यथा महापालिकेत आंदोलन करू, असे रवींद्र धंगेकर यांनी सांगितले.

# शिरूर तालुक्यात महिला मंडल अधिकाऱ्याला धमकी; तलाठी संघ आक्रमक

**शिरूर । प्रतिनिधी**

**शिरूर तालुक्यातील मलठण येथे कार्यरत महिला मंडल अधिकारी माधुरी वसंत बागले यांना भानुदास खामकर यांनी फोनद्वारे अश्लील भाषेत शिवीगाळ करत धमकी दिल्याच्या घटनेने महसूल प्रशासनात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी महाराष्ट्र राज्य तलाठी संघटनेने आक्रमक पवित्रा घेत संबंधित व्यक्तीवर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे. दोन दिवसांत गुन्हा दाखल करून खामकर यांना अटक न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.**



या घटनेच्या निषेधार्थ तलाठी संघटनेने शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब मस्के यांना निवेदन सादर केले. निवेदनात भानुदास खामकर यांच्यावर दोन दिवसांत गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी ग्राममहसूल अधिकारी आबासाहेब मोरे, ए.ए. जोरी, मनीषा राऊत, अनिता भालेराव, अनुष्का घुगे, आर.टी. घोडे, के.डी. माने, शलाका भालेराव, वाय.एस. टिळेकर, दिपाली नवले, जे.डी. धुरंदर, आर.जी. अरदवाड, आर.पी. जाधव, मंडल अधिकारी नंदकुमार खरात, कपिल बोडरे, अशोक बडेकर, सिद्धार्थ वाघमारे, आदित्य गायकवाड, सतीश पलांडे, दीपक मोरे, विकास फुके आदी कर्मचारी उपस्थित होते.

माधुरी बागले या सध्या मलठण येथे मंडल अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. दीड वर्षांपूर्वी त्यांच्याकडे टाकळी हाजी मंडळाचा अतिरिक्त कार्यभार होता. त्या काळात शिनगरवाडी (ता. हाजी) येथील खातेदार भानुदास खामकर यांच्या रस्ता खुला करण्याच्या अर्जावर तत्कालीन तहसीलदारांच्या आदेशानुसार कारवाई करत रस्ता खुला करण्यात आला होता. मात्र, २० मे २०२५ रोजी दुपारी १:३० वाजता खामकर यांनी बागले यांना फोनवर संपर्क करून या प्रकरणावरून अश्लील आणि लज्जास्पद भाषेत शिवीगाळ केली. इतकेच नव्हे, तर तुला बघून घेईन अशी थेट धमकी दिली.ही घटना केवळ एका महिला अधिकाऱ्याच्या प्रतिष्ठेला धक्का देणारी नसून, महसूल प्रशासनातील महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण करणारी आहे. तलाठी संघटनेने या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत अशा वर्तनामुळे प्रशासकीय यंत्रणेतील कार्यक्षम अधिकाऱ्यांचे मनोबल खच्ची होते, असे म्हटले आहे. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कठोर कायदेशीर कारवाई आवश्यक असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

# हगवणे कुटुंबातील छळाची कहाणी: मोठ्या सुनेचे धक्कादायक आरोप, संशयाच्या भोवऱ्यात आलेला निलेश चव्हाण कोण?

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात नवनवे खुलासे समोर येत आहेत. आता या प्रकरणात हगवणे कुटुंबातील मोठ्या सुनेने देखील धक्कादायक आरोप केले आहेत. २०२२ मध्ये सुशील हगवणे यांच्यासोबत लग्न झालं होतं. तेव्हापासून नणंद, दीर आणि सासू या कायम टॉर्चर करत असल्याचा गंभीर आरोप मयुरी जगताप हगवणे हिने केला आहे. पण यामध्ये सर्वात मोठी गोष्ट म्हणजे सुशील हे त्यांच्या पाठीशी होते, त्यांना कामय पाठिंबा दिल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे आता या प्रकरणात कुटुंबिक हिंसाचाराचा प्रकार उजेडात आला आहे.



हगवणे कुटुंबातील सुनासोबत होत असलेल्या छळाची कहाणी मोठ्या सुनेने सांगितल्याने सर्व स्तरातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. तसेच मयुरीने स्वतः मारहाणीचे फोटो माध्यमांसमोर दाखवले. माझा नवरा कायम माझी बाजू घ्यायचा म्हणून त्यालाही त्याच्या कुटुंबियांनी मारहाण केली असल्याचा गंभीर आरोपही तिने केला आहे. घरातील जमिनीचे व्यवहार असतील तर त्यात वाटा मिळू नये, यासाठी दीर आणि सासऱ्याने कायम आडकाठी आणली. यातून आम्हाला मानसिक–शारिरिक त्रास दिला, असेही तिने सांगितली.

कोण आहे निलेश चव्हाण?

वैष्णवी यांचे ९ महिन्यांचे बाळ वैष्णवीचे आई–वडील यांच्याकडे सूपूर्त करण्यात आले आहे. याबाबात बोलताना मयुरी जगताप हगवणे हिने माहिती दिली. या संपूर्ण प्रकरणात आता निलेश चव्हाण या व्यक्तीचे नाव समोर आले आहे. याविषीयी बोलताना मयुरी म्हणाली, निलेश चव्हाण हा आमच्या घरातील भांडणामध्ये कायम आलेला आहे. तो शशांक हगवणेचा मित्र नाही तर करिश्मा हगवणेचा मित्र आहे. आमच्या मिटिंग सुद्धा त्याच्या ऑफिसलाच झालेल्या आहेत. आमचं नवीन लग्न झालेलं होतं तेव्हा माझी नणंद आणि माझी सासू या त्याच्या ऑफिसमध्ये कायम मिटिंग घ्यायच्या, अशी माहिती मुयरी हिने माध्यमांशी बोलताना दिली.